पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई • वर्ष: 8 • अंक: 2 • 16 जानेवारी 2026 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.





# धन्यवाद मुंबई, धन्यवाद महाराष्ट्र



## अध्यक्षीय मनोगत

# हा विजय म्हणजे नव्या जबाबदारीचा शुभारंभ!

भारतीय जनता पार्टीच्या सर्व विजयी उमेदवारांचे आणि त्यांना निवडून आणण्यासाठी दिवस-रात्र एक करणाऱ्या तमाम कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन! आपले लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तुम्हा सर्वांच्या अपार कष्टामुळे भारतीय जनता पार्टीने हे 'विजय पर्व' साकारले आहे. भारतीय जनता पार्टीवर असलेल्या जनतेच्या अढळ विश्वासाचे प्रतिबिंब या ऐतिहासिक विजयामध्ये उमटले आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' हे आपल्या भाजपा परिवाराचे सूत्र आहे. विकासपुरुष आदरणीय मोदीजींच्या नेतृत्वात 'विकसित भारत' घडतो आहे. आदरणीय देवेंद्रजींच्या नेतृत्वात आपला महाराष्ट्र देखील प्रगतिपथावर झपाट्याने वाटचाल करत आहे. पारदर्शी, विकासाभिमुख आणि लोककल्याणकारी कार्यप्रणाली ही आपल्या भाजपा परिवाराची ओळख आहे. या ओळखीला जागून राष्ट्रहित, हिंदुत्व आणि लोकसेवा ही त्रिसूत्री तुम्ही सर्वजण नक्कीच आचरणात आणाल, असा विश्वास आहे. त्यासाठी भाजपा परिवारातील सर्व विजयी उमेदवारांना शुभेच्छा! यशाचे वाटेकरी अनेक असतात, पण अपयश मात्र पोरके असते असे म्हणतात... पण आपला भाजपा परिवार मात्र याला अपवाद आहे. आज ज्या उमेदवारांना काही कारणाने पराभवाला सामोरे जावे लागत आहे, पक्ष संघटना म्हणून भाजपा परिवार त्या सर्वांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. जनतेचा कौल मान्य करून आत्मपरीक्षण करूया आणि अपयशाचे कारण समजून घेऊया. पुन्हा एकदा नव्या जोमाने राष्ट्रसेवा आणि लोकसेवेचं व्रत पुढे नेऊया! भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून मी कायमच सर्व कार्यकर्त्यांसोबत असेन.

वर्षानुवर्षे भाजपा कार्यकर्त्याने यशाच्या दिशेने पार्टीला नेण्याचे स्वप्न पाहिले आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी झोकून देऊन काम केले. त्याग व समर्पण भावनेतून असंख्य कार्यकर्त्यांनी पार्टीची विचारधारा तळागाळात पोहोचवली. हा विजय सर्व कार्यकर्त्यांना समर्पित करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा कार्याध्यक्ष नितीन नबीन, जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने विकासाच्या अजेंड्यावर निवडणूक लढली. या निवडणुकीत भावनिक आवाहन करून मतदारांना भुरळ घालण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला, पण अशा भोंदूगिरीला जनता भुलत नाही, हेच निकालातून स्पष्ट झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून निवडणुका या भावनिक आवाहनांवर लढवल्या जात होत्या आणि अनेक मतदार त्या दिशेने प्रभावित होत होते. 'व्हिजन महाराष्ट्र' आणि महाराष्ट्राला ट्रिलियन इकॉनॉमीकडे नेण्याच्या संकल्पनेला मतदारानी जो भरभरून आशीर्वाद दिला, त्याबद्दल भारतीय जनता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून आणि सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने मी संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे मन:पूर्वक आभार मानतो व कृतज्ञता व्यक्त करतो.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

धन्यवाद मुंबई, धन्यवाद महाराष्ट्र ..... ०४



मुंबईही जिंकली ..... ०६



मराठीच्या नावावर राजकारण करण्याचे दिवस संपले ..... ०९



‘ठाकरे ब्रँड’ चा बुडबुडा फुटला ..... १२



मराठी माणसाच्या नावावर राजकारण... ..... १४



इन्फ्रा मॅन देवेंद्र फडणवीस ..... १८



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# धन्यवाद मुंबई, धन्यवाद महाराष्ट्र

● **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

> महाराष्ट्राच्या जनतेने महापालिकांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीला दिलेल्या महाविजयाबद्दल मतदारांना मन:पूर्वक धन्यवाद. मतदारांनी सुशासन, विकास आणि पारदर्शकतेला कौल दिला आहे. हा महाविजय सर्व कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी नम्रतापूर्वक स्वीकारला पाहिजे.

**मुंबईसह** संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वाधिक जागा जिंकत क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. भाजपा–महायुतीच्या विकास, सुशासन आणि पारदर्शक कारभाराला मुंबई आणि इतर महापालिका क्षेत्रातील जनतेने स्पष्ट कौल दिल्याबद्दल मतदारांचे आभार मानतो. विकासाचा अजेंडा घेऊन आम्ही जनतेमध्ये गेलो आणि जनतेने भाजपावर विश्वास ठेवत भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल मतदारांचा आभारी आहे. हा विजय भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला समर्पित आहे.

जनतेला विकास हवा आहे, प्रामाणिकता हवी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास पुन्हा एकदा या निकालाने स्पष्ट केला आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी होता म्हणून विजय शक्य झाला असेही त्यांनी नमूद केले. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास आणि उन्नती हेच ध्येय ठेवून यापुढेही कार्य केले जाईल. भाजपाच्या कार्याचा आत्मा, विचारांचा आत्मा हिंदुत्ववाद आहे आणि त्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. आमचे हिंदुत्व हे संकुचित नाही तर जो कोणी भारताच्या संस्कृतीचा मान राखतो तो प्रत्येक जण हिंदू आहे असे आम्ही समजतो.




जनतेचे प्रेम भाजपाला लाभले आहे. या विजयामुळे कार्यकर्त्यांना आनंद होणे स्वाभाविक असले तरी कार्यकर्त्यांनी या विजयामुळे आपल्यावरील जबाबदारीचे आणि मतदारांनी दाखविलेल्या विश्वासाचे भान सातत्याने ठेवले पाहिजे. या यशाचा उन्माद कार्यकर्त्यांनी करू नये. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी अधिक वाढली आहे. पुढील काळात सर्व लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते यांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी निस्वार्थ भावनेने काम करायचे आहे. या निवडणुकीत महायुतीतील सर्व मित्र पक्षांनी एकदिलाने काम केले. त्यांचेही मी या निमित्ताने आभार मानतो. सन्माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रामदासजी आठवले, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जयदीप कवाडे आणि महायुतीतील सर्व घटक पक्षांना मी धन्यवाद देतो. महाराष्ट्रातील जनतेचे आपल्याशी असलेले नाते आणखी दृढ झाले आहे. जनतेने दिलेल्या या आशीर्वादाबद्दल मी जनतेचेही आभार मानतो. ■


आता भ्रष्टा
विळख्यातून मुंबई घेणार मुक्त श्वास !
क, हेच मुंबईचे नगरसेवक !
बृहन्मुंबई महानगरपालिका


महानगरपालिका
धुरंधर
देवेंद्रजी





# मुंबईही जिंकली



> राज्यात २९ महापालिकांच्या निवडणूका नुकत्याच पार पडल्या. या २९ पैकी फक्त एका म्हणजे मुंबई महापालिकेच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. याचे कारण मुंबई महापालिका म्हणजे ठाकरे असे समीकरणच तयार झाले होते. उद्धव ठाकरे यांनी २०१९ पासून काँग्रेस आणि शरद पवारांशी घरोबा केल्यानंतर भारतीय जनता पार्टीशी शत्रुत्वच घेतले होते.

**मुंबई** महापालिकेत फक्त आमचा आवाज घुमणार ही 'उबाठांची घमेंड' मतदारांनी या निवडणुकीत जिरवली, हाच या निवडणुकीचा अर्थ आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर उद्धव ठाकरेंच्या सर्व आशा मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे केंद्रीत झाल्या होत्या. मुंबईत विजय मिळवून आपण पुन्हा राज्याच्या राजकारणात प्रमुख स्थान मिळवू अशी आशा त्यांना वाटत होती. स्वत:च्या बळावर विजय मिळेल की नाही, याची खात्री नसल्याने उबाठांनी राज ठाकरेंशी असलेले १९ वर्षाची राजकीय भावकी संपवली. एवढे करूनही उबाठांना मुंबईची सत्ता मिळवता आली नाही. अन्य २८ महापालिकांपैकी काही ठिकाणी उबाठांना भोपळाही फोडता आलेला नाही. अर्थात उबाठांना मुंबई बाहेरच्या निकालांशी काहीच देणे–घेणे नव्हते. त्यांचा डोळा फक्त आणि फक्त मुंबई महापालिकेवरच होता. याचे कारण मुंबई महापालिकेचे सुमारे ८० हजार कोटींचे बजेट. उद्धव ठाकरे यांच्या अहंकारी, स्वार्थी राजकारणाचा हा पराभव आहे. भारतीय जनता पार्टीला शत्रू क्रमांक १ मानत उबाठांनी गेल्या ६ वर्षात भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाबद्दल अत्यंत विखारी भाषा वापरली. मतदारांनी उद्धव ठाकरेंच्या याच राजकारणाला नाकारले आहे.

राज्यात काही महिन्यांपूर्वीच नगरपालिका, नगर पंचायतीच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने एक हाती यश मिळवले. उद्धव ठाकरे यांनी नगरपालिका निवडणुकांसाठी एक सभाही घेतली नाही.

त्यांना चिंता होती फक्त मुंबईची. गेली २५ वर्षे मुंबई महापालिका ताब्यात असताना मुंबईतील नागरी समस्याही पूर्णपणे सोडविता न आलेल्या उद्धव ठाकरे यांच्याकडे आपण केले हे सांगण्यासाठी एकही मुद्दा नव्हता. त्यामुळेच त्यांनी 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार' ही वर्षानुवर्षे चालू असलेली कॅसेट वाजवणे सुरू केले. मुंबई महापालिकेच्या निवडणुका आल्या की उद्धव ठाकरेंना या मुद्याची आठवण होते. केंद्रात कोणाचीही सत्ता आली तरी मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीच वेगळे करू शकत नाही. सामान्य माणसालाही मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची भाषा चांगलीच ठाऊक झाली आहे. ईसाप नितीतील लांडगा आले रे आला... या गोष्टीप्रमाणे उद्धव ठाकरेंच्या मुंबई तोडणारच्या हाळीची अवस्था झाली आहे. उद्धव ठाकरेंनी मुंबई तोडणारची कितीही भीती दाखवली तरी सामान्य मुंबईकर त्यावर विश्वास ठेवायला तयार नाही, हा या निवडणुकीचा आणखी एक महत्वाचा निष्कर्ष आहे. मुंबईतल्या मराठी माणसाच्या दोन पिढ्यांनी या भीतीला घाबरून उबाठांना मतदान केले. गेल्या ६ वर्षात उबाठांनी आपल्या राक्षसी महत्वाकांक्षेसाठी भारतीय जनता पार्टीचा विश्वासघात करत केलेल्या राजकारणाचा परतावा मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतून उबाठांना मिळाला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत व्होट-जिहाद आणि संविधान बदलच्या खोट्या प्रचारामुळे उबाठांना महाराष्ट्रात लॉटरी लागली होती. विधानसभा निवडणुकीतही आपणच जिंकणार या माजात असलेल्या उबाठांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून, 'एक तर तू राहशील, नाहीतर मी राहीन,' यासारखी भाषा वापरली होती. राजकारणात कितीही विरोध असला तरी प्रतिस्पर्ध्याबाबत अशी भाषा वापरायची नाही, याचेही भान उबाठांना राहिले नव्हते. राज ठाकरे यांच्याशी समझौता केल्यावर उबाठांना आता आपल्याला कोणीच हरवू शकणार नाही, असा गर्व झाला होता. 'गर्वाचे घर खाली' या म्हणीप्रमाणे मतदारांनी उबाठांचे गर्वहरण केले. आपण कसेही वागलो तरी भावनाशील मराठी माणूस आपल्या पाठीशी उभा राहील, ही उबाठांची अपेक्षाही मतदारांनी खोटी ठरवली.




२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत व्होट-जिहादचा जो घातक प्रयोग झाला होता त्याची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न उबाठांनी मुंबईत करून पाहिला. न्यूयॉर्क आणि लंडनमध्ये ज्याप्रमाणे मुस्लिम धर्मीय महापौर झाला, त्याप्रमाणे आम्हाला एकगठ्ठा मतदान केल्यास तुमचा महापौर करू, असे वचन उबाठांनी मुस्लिम संघटनांना दिले होते. स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी मतांसाठी मुस्लिमांच्या अनुनयाच्या राजकारणाला कायम कडवा विरोध केला. उबाठांनी सत्तेसाठी अगतिक होऊन मुस्लिमांच्या अनुनयाचा खेळ सुरू केला. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने उबाठांच्या या घातकी खेळाचा पर्दाफाश करत हिंदू मराठी महापौर देण्याचे जाहीर केले. केवळ वडिलांच्या पुण्याईवर राजकारणात २५ वर्षे काढलेल्या उद्धव ठाकरेंच्या राजकीय शहाणपणाचा भोपळा या निवडणुकीत फुटला. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने मुंबईची निवडणूक फक्त आणि फक्त विकास कामांच्या आधारे लढवण्याचा निर्धार केला आणि अखेरपर्यंत भारतीय जनता पार्टीचे नेतृत्व या निर्धाराशी एकनिष्ठ राहिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका निवडणुकीच्या प्रचारात राज्यभर प्रवास करून ३७ सभा घेतल्या. याखेरीज देवेंद्रजींनी विविध दूरचित्रवाणी वाहिन्यांना ३३ तर मराठी अभिनेते-अभिनेत्रींना ६ मुलाखती दिल्या. या प्रचारसभांमधून आणि मुलाखतींमधून देवेंद्रजींनी महानगरांच्या भविष्यकाळातील गरजानुसार

करावयाच्या विकास कामांबाबतची माहिती जनतेपुढे ठेवली. त्याचबरोबर त्यांनी महापालिकांमधील पाणी, रस्ते, सार्वजनिक वाहतूक यासारख्या समस्या सोडविण्यासाठी आगामी काळात राज्य सरकार केंद्र सरकारच्या सहकार्याने कोण-कोणते प्रकल्प सुरू करू इच्छिते याची सविस्तर माहितीही मतदारांपुढे ठेवली. मुंबई मेट्रो, पुणे मेट्रो या सार्वजनिक वाहतूक सुविधेमुळे मुंबई-पुण्यातील नागरिक वाहतूक कोंडी मुक्त प्रवासाचा अनुभव सध्या घेत आहेत. देवेंद्र फडणवीस हे जे बोलून दाखवतात ते करूनही दाखवतात, याची प्रचिती मतदारांना गेल्या १० वर्षात अनेकदा आली आहे. त्यामुळेच राज्यभरातील मतदारांनी देवेंद्रजींच्या क्रियाशील आणि वचने प्रत्यक्षात आणणाऱ्या नेतृत्वावर भरभरून विश्वास व्यक्त केला आहे. कोल्हापूरसारख्या शहरात जिथे भारतीय जनता पार्टीचे अस्तित्व नाममात्र म्हणण्याएवढेही नव्हते, त्या शहराची महापालिका आता भारतीय जनता पार्टीच्या हातात आली आहे. ही सारी देवेंद्रजींच्या विश्वनीय कर्तृत्वाची आणि कार्यक्षम नेतृत्वाची किमया आहे. उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना मुंबईकरांच्या जिव्हाळ्याच्या मेट्रो प्रकल्पाला स्थगिती दिली. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात कोरोनाचे संकट आले. या संकटाचा वापर करून मृताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा निलाजरेपणाही उबाठांनी दाखवला. त्या काळात उबाठा सरकारचे कोविड सेंटर, खिचडी वाटप यासारखे अनेक घोटाळे उघडकीस आले आहेत.



वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीतच शिवसेनेसारख्या लढाऊ संघटनेची सारी सूत्रे उबाठांनी आपल्या ताब्यात घेतली होती. शिवसेनेचा आत्मा सामान्य कार्यकर्ता आणि शाखाप्रमुख या व्यवस्थेत दडला आहे. बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक वर्षे परिश्रम करून या व्यवस्थेच्या आधारे शिवसेनेची पाळेमुळे मुंबईत रूजवली. उबाठांनी ही व्यवस्था उद्धवस्त करण्याचे काम गेल्या २५-३० वर्षात केले. वंदनीय बाळासाहेबांना सामान्य शिवसैनिक सहज भेटत असे. वंदनीय बाळासाहेबही या ना त्या निमित्ताने शाखाप्रमुखांशी आणि सामान्य शिवसैनिकांशी सातत्याने संवाद करत असत. उबाठांनी शाखाप्रमुख, कार्यकर्ते यांना आपल्या जवळ फिरकूही दिले नाही. यावेळची निवडणूक ही आपल्या अस्तित्वाची अखेरची लढाई आहे, हे लक्षात आल्यानंतर उद्धव ठाकरेंना शाखाप्रमुखांची आणि सामान्य कार्यकर्त्यांची आठवण झाली. आपल्या पक्षप्रमुखांचा हा ढोंगीपणा उबाठा गटाच्या सामान्य कार्यकर्त्यांना सहज लक्षात आला.

मुंबईबरोबरच भारतीय जनता पार्टीने छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरातही मोठे यश मिळवत आपल्या वाढत्या ताकदीचा प्रत्यय दिला आहे. भारतीय जनता पार्टीला सत्ता मिळू नये यासाठी उद्धव ठाकरेंना आपल्या बाजूने वळवणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षालाही अनेक महापालिकांमध्ये एकही जागा मिळवता आलेली नाही. अनेक वर्षे महाराष्ट्राचे चाणक्य म्हणून ज्यांचा गवगवा केला गेला त्या पवारसाहेबांच्या पक्षाची अत्यंत दारूण अवस्था झाली आहे. या निकालातून महाराष्ट्राच्या मतदारांनी अनेक धडे दिले आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासारखे स्वार्थी, अहंकारी, खुनशी राजकारण स्वीकारले जाणार नाही. त्याचबरोबर राज ठाकरे यांच्यासारख्या दिवसाला भूमिका बदलणाऱ्या नेत्यालाही मतदारांनी घरी बसवले आहे. मतदारांना गृहीत धराल तर तुम्हाला पराभवाखेरीज काही मिळणार नाही, हेही मतदारांनी या निवडणुकीतून दाखवून दिले आहे. यातून ठाकरे बंधू काही धडा घेतील, अशी अपेक्षा करणे त्यांच्या आजवरच्या वाटचालीकडे पाहिल्यावर चुकीचे ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आणि देवेंद्र फडणवीस यांच्या कर्तृत्वावर मतदारांचा प्रचंड विश्वास आहे, हाही या निवडणुकांचा निष्कर्ष आहे. ■

# मराठीच्या नावावर राजकारण करण्याचे दिवस संपले



आभार मुंबईकर, आभार महाराष्ट्र.... विकास, विकास आणि फक्त विकासाचा शब्द मी सर्वच महानगरांमधील आबालवृद्धांना आज देत आहे. त्यासाठी, 'सब का साथ, सब का विकास' हे पंतप्रधान मोदीजींचे ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका निवडणुकीतील देदीप्यमान यशानंतर लोकमतचे सहसंपादक यदू जोशी यांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

**गेल्या** २५-३० वर्षांत मुंबईतून मराठी माणूस मोठ्या प्रमाणात हद्दपार झाला, आता ती वेळ त्यांच्यावर येणार नाही. आम्ही त्यांना मुंबईतच रोजगार देऊ आणि मुंबईतच हक्काचे घर देऊ, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. तसेच, मुंबईकरांना मराठी-अमराठीचे राजकारण करून त्यांच्यात वितुष्ट आणण्याचे दिवस आता संपले, मराठीजनांचा सन्मान राखणारच पण इतरांना हिणवले असे होणार नाहीच अशी ग्वाहीदेखील फडणवीस यांनी दिली. राज्यातील महापालिकांच्या एकात्मिक विकासाचे धोरण आम्ही आणू, देशाच्या इतर भागात आणि जगातही महापालिकांमध्ये ज्या-ज्या आदर्श अशा योजना असतील त्या मुंबईसह राज्यातील महापालिकांध्ये नक्कीच आणू असे फडणवीस म्हणाले. मुंबईकर, पुणेकर असोत की नागपूरकर त्यांच्यासमोर निवडणुकीच्या काळात मी जी भाषणे दिली त्यात मी केवळ आणि केवळ विकासाचाच अजेंडा मांडलेला होता. तो भाषणांपुरता किंवा टाळ्या घेण्यापुरता नव्हता याची प्रचिती सर्वच महानगरांना नक्कीच येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या क्षणी मी, पक्षातील सगळे नेते, हजारो कार्यकर्ते अत्यानंदी आहोत. आजचा दिवस कोणावर टीका करण्याचा, उणेदुणे काढण्याचा नाही. निवडणुकीतही मला नाइलाजाने काही जणांवर टीका करावी लागली, कारण आधी समोरून टीकेचे बाण आले होते असे म्हणत फडणवीस यांनी ठाकरे बंधुंबाबत बोलण्याचे टाळले. आजचा विजय आम्ही नम्रपणे स्वीकारत आहोत. मी आमच्या कार्यकर्त्यांनाही सांगत आहे की उन्मादाने कोणीही वागू नका. महापालिकांचा कारभार आम्हाला पारदर्शक करायचा आहे. या निवडणुकीत आपण आणि ठाकरेबंधु यांनी एकमेकांवर टोकाची टीका केली याकडे लक्ष वेधले असता ते म्हणाले की, निकालाने ते सगळे संपावे अशी माझी भावना आहे. मला बदलाचे राजकारण करायचे आहे, बदल्याचे नाही हे मी आधीही सांगितलेले आहे. जनतेने कोणाला का स्वीकारले आणि कोणाला का नाकारले याचे आत्मपरीक्षण विरोधकांनी करावे एवढीच माझी अपेक्षा आहे आपल्या कार्याचा, विचारांचा आत्मा हा हिंदुत्ववादच आहे. या हिंदुत्ववादाच्या आत्म्यानेच आपल्याला सगळीकडे पोहोचविले. आमचे हिंदुत्व व्यापक आहे. आमचा पुढचा अजेंडाही विकासच असणार आहे. शहरांना परिवर्तित करून सामान्यांच्या, गोरगरिबांच्या जीवनात परिवर्तन आणू. ■



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नागपूरच्या विजयोत्सावत सामील झाले होते.












केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खा. अशोक चव्हाण, खा. धनंजय महाडिक, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे आदी नेते विजयोत्सवात सामील झाले होते.



जालना



छत्रपती संभाजीराजे नगर




पनवेल

## सामान्य कार्यकर्त्यांचा विजय



मुंबईतून नवनाथ बन आणि पुण्यातील अमर आवळे या दोन अतिशय सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या तरुणांचा विजय वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे.





अहिल्यानगर

# ‘ठाकरे ब्रँड’ चा बुडबुडा फुटला

● प्रसाद देशपांडे

> 'फक्त ठाकरे' म्हणजे मराठी नाही, 'आजचे ठाकरे' तर नाहीच नाही, 'फक्त ठाकरे' म्हणजे मुंबई नाही! आणि 'फक्त ठाकऱ्यांनी' मराठीचा मक्ता घेतलेला नाही किंवा त्यांना कुणी दिलेला नाही, कुणा एका कुटुंबाने माझ्या माय मराठीची एकल मक्तेदारी निभवावी इतकी वेळ मराठी भाषेवर आलेली नाही! हाच संदेश मुंबईकरांनी दिला आहे.




**इतकी** वर्ष मुंबईत सत्ता उपभोगून पुन्हा आता जर आम्हाला निवडलं नाही तर मराठी माणुस मुंबईतून बाहेर फेकला जाईल हे ठाकरे बंधूंनी म्हणणं म्हणजे निर्लज्जपणाचा कळस आहे! अरे तुमच्या हातात होती ना सत्ता? मग कसा काय मराठी माणुस मुंबईच्या बाहेर फेकला गेला, तो इतका फेकला गेला की आज बऱ्याच वॉर्डमध्ये अमराठी मतदार निकाल ठरवू शकतात इतकी शक्ती त्यांची आहे! तुमच्या हातात महापालिकेची सत्ता होती ना? साधी गटारं स्वच्छ झाली नाहीत तुमच्याकडून! मुंबईची तुंबई रोखू शकला नाहीत, आरोग्य व्यवस्था देऊ शकला नाहीत, काय दिलंत तर म्हणे पेंग्विन आणले, नाईट क्लब रात्रीपर्यंत चालू ठेवले! किती नवीन मराठी शाळा महापालिकेने सुरु केल्यात? नवीन सोडा होत्या त्यातल्या किती जगवल्यात? डम्पिंग ग्राऊंड चा प्रश्न सोडवला? किमान शिवाजी पार्कवर अतिक्रमणं होऊ नयेत, ते खेळण्यापुरतं मर्यादित राहावं ह्याकडे किती लक्ष दिलं? बिल्डर लॉबी अस्ताव्यस्त पसरत होती काय केलं त्याला आटोक्यात आणायला? कुठल्यातरी मराठी माध्यमाने हा प्रश्न विचारला का हो ठाकऱ्यांना? पत्रकारांनी? फालतु चाळे करणाऱ्या सोशल मीडिया इन्फल्युएंसर्स नी? मराठी कलाकारांनी? बरं किमान त्या जाहिरातीत पार्कमध्ये मराठी माणसाला बंदिस्त दाखवणाऱ्या कलाकारांनी? ओह नाही ते कसे विचारणार ना? कारण ह्यातले बहुतांश लोक आज मुंबईत स्वतःच घर विकत घेऊ शकण्याची आर्थिक कुवतच बाळगत नाहीत! काही महाभाग कलाकार तर मुंबईतली आपली असलेली घरं विकून गावी वाडे बांधून स्थायिक झालेत, ते कसे विचारणार, कुठल्या तोंडाने विचारणार की काय हो आमचे वाडवडील चाळीत का होईना पण मुंबईत राहायचे पण आज करोडो रुपये असून सुद्धा आम्ही 'अफोर्ड' नाही करू शकत, का? हे विचारलं तर त्या त्या क्षेत्रातले त्यांचे ठाकऱ्यांशी व्यावसायिक संबंध असणारे त्यांचे बॉसेस त्यांना बॉयकॉट करतील आणि बिचाऱ्या प्रश्न विचारणाऱ्यांचे वांदे होतील! ही खरी मेख आहे!

ठाकरे बंधूंचं एकच चुकलं ते म्हणजे त्यांच्या पुढच्या पिढीने स्वतःला 'बाळासाहेब' समजायची चूक केली! बाळासाहेब बाळासाहेब होते! एकमेवाद्वितीय! मला त्यांच्या बऱ्याच गोष्टी खटकायच्या पण तो माणुस वेगळा होता, दिलदार होता, लढवैय्या होता, स्ट्रीट स्मार्ट होता, आणि मुख्य म्हणजे 'ठाकरे' ह्या ब्रॅण्डचा 'एकमेव' मालक होता! द सरिअल ओजी! त्यांनी उभी केलेली संघटना, त्याची कार्यशैली शाखांचं जाळं हे युनिक होतं! हे युनिकनेस



त्यांच्या पाठोपाठ गेलं आणि शिवसेना पक्षाच्या ऱ्हासाची सुरुवात झाली! पक्ष 'मातोश्रीवर' बसून चालत नसतो, पक्ष मीडियातून चालत नसतो, पक्ष सभा घेऊन चालत नसतो, पक्ष उत्तम नकला करून चालत नसतो, पक्ष पावर पॉईंट प्रेझेंटेशन देऊन चालत नसतो, पक्ष फेसबुक लाईव्ह करून चालत नसतो, पक्ष विरोधकांना टोमणे मारून चालत नसतो! ह्यातल्या कुठल्याच एनटीटीवर पूर्णपणे अवलंबून न राहता जमिनीवर उतरून काम केल्यामुळे बाळासाहेब पक्ष उभा करू शकले! हे ठाकऱ्यांच्या आजच्या पिढीला कधीच उमगणार नाही, उमगलं असतं तर शाखा शाखांना शेवटच्या ७-८ दिवसात भेटी न देता किमान ३-४ महिन्यांपूर्वी हे चालु केलं असतं!

आज ठाकरे एका ट्रॅपमध्ये अडकलेत, आणि त्यांच्या आजूबाजूला असलेले बडवे त्यांना त्यातून बाहेरच पडू देत नाहीय! तो ट्रॅप आहे 'इल्युजनरी रियालिटी' चा! माध्यमातील काही पत्रकार, निवडक नेते मंडळी, पक्षाचे सरंजाम हे ठाकऱ्यांसमोर 'इल्युजन' उभं करतायत, मायाजाल! तुम्ही म्हणजे ब्रँड तुम्ही म्हणजे सबकुछ, आणि तुम्ही 'एलिट' आहात तुम्हाला काही करायची गरज नाही, फक्त एक दोन सभा घ्यायच्या, बास वारं फिरलं म्हणूनच समजा! जोपर्यंत ठाकरे ह्या मायाजालातून बाहेर पडत नाहीत, तुसडेपणा न करता, हिंदू धर्मातील परंपरांची खिल्ली न उडवता, शर्टाची इस्त्री सांभाळत उभं न राहता, आपला सुपिरियरिटी कॉम्प्लेक्स बाजूला ठेवून लोकांमध्ये गेलेत तरच ग्राऊंड रियॅलिटीच्या प्रकाशाने खडबडून जागे होतील!

बाकी राज ठाकरेंना काय म्हणणार, त्यांना लागलेलं पनौतीचक्र थांबतच नाहीय! ज्यांच्याकडे जातायत त्यांना स्वतःसकट पराभवाची चव चाखवतायत! लोकसभेला महायुती, आणि आज स्वतः बंधुराजांचा पक्ष! कधीकधी मला वाटतं ह्यांना खरंच राजकारण करायचं आहे की नाही? असो! तुमचे विरोधक तुमच्या कितीतरी पटीने हुशार आहेत, चाणाक्ष आहेत, धूर्त आहेत, साधनसामुग्री युक्त आहेत! त्यांच्याशी पारंपरिक दृष्टिकोनातून लढलात तर उपयोग नाही! बाळासाहेबांची ताकद रस्त्यावर उतरून काम करणारा शिवसैनिक होता, कीबोर्ड बडवणारा शिवसैनिक नव्हता, ह्याच भान कधीच तुम्हाला नव्हतं त्यामुळे तुम्ही भलत्याच विश्वात रममाण होता! एक मात्र खरं आज राज उद्धव ह्यांच्या सोबत नसते तर युबीटीचा आकडा चाळीशीत गुंडाळला गेला असता! राज ह्यांचं नेतृत्व आणि युबीटीचा कॅडर ह्यांच्यामुळे त्यांना दखलपात्र जागा मिळाल्यात ह्यात उद्धव ह्यांचा वाटा कितपत प्रश्नच आहे! पण मिळालेल्या जागांमुळे बीएमसीत उत्तम विरोधी पक्षाची भूमिका ते निभावू शकतील!

तुम्ही एक नोटीस केलं का? एका बीएमसीसाठी ठाकऱ्यांनी सर्व नगरपरिषदा, इतर महानगरपालिका ह्याकडे दुर्लक्ष केलं! फोकस फक्त आणि फक्त मुंबई महापालिका! तरीही पदरी पराभव पडलाय ह्यातून काय सिद्ध होतं, निर्विवाद हेच सिद्ध होतं की ठाकरे ब्रँड ठाकरे ब्रँड ही मीडियाने जी टुम लावलीय त्या 'ठाकरे ब्रँड'चे पहिले, आणि शेवटचे असे एकमेवाद्वितीय ब्रँड अँबेसेडर फक्त बाळासाहेब होते! इतर कुणीही नाही, कुणीही नाही! मुळात आजच्या ठाकरेंनी फक्त स्वतःच्या नावावर एकही निवडणूक जिंकलेली नाही! ज्या जिंकल्याचा किंवा ज्यात उत्तम परफॉर्मन्स आलाय त्या एकतर बाळासाहेबांच्या नावाने, किंवा मग भाजपसोबत युतीत असल्यावर मोदींच्या नावाने! काही लोकांच्या मनांत २०१९ ला आलेलं अडीच वर्षांचं ठाकरे मुख्यमंत्री असलेलं सरकार येईल, पण तो मतदानाचा कौल झिडकारून 'चोरलेला' विजय होता! आजही काही भांड मंडळी बेशरमपणे नॅरेटिव्ह चालवायचा प्रयत्न करतायत 'नाही नाही ठाकरे काही पूर्णपणे हरलेले नाहीत, बऱ्यापैकी जागा आल्यात निवडून त्यांच्या'! भाई पराभव हा पराभव असतो मग तो एका जागेने होवो की शंभर जागांनी! आता कुणाला 'नैतिक विजय' दाखवायचा उमाळा आला असेल तर खुशाल दाखवा, त्याने फॅक्ट्स बदलत नाहीत, आणि फॅक्ट्स आहेत मुंबई महापालिकेसकट संबंध महाराष्ट्रात ठाकरे बंधूंचा पराभव झाला आहे, काय झालाय पराभव! ■

# मराठी माणसाच्या नावावर राजकारण करणा-यांनी आधी इतिहासात डोकवावं...

● रविंद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष

> संयुक्त महाराष्ट्रासाठी १०५ हुतात्म्यांनी जे रक्त सांडले, त्या आंदोलनावर गोळ्या झाडण्याचं पाप काँग्रेसचं आहे, हे इतिहासात नोंदलेलं सत्य आहे. सत्तर वर्षांपूर्वी १६ जानेवारी १९५६ रोजी नेहरूंनी मुंबई केंद्रशासित करण्याची घोषणा केली होती. त्या घटनेतून प्रेरित होऊनच बाळासाहेबांनी शिवसेनेची स्थापना ही 'मराठी माणसाच्या न्यायहक्कासाठी' केली, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

उबाठा गटातील नेते जाणीवपूर्वक एक गोष्ट विसरतात की संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलकांवर गोळीबार करणारे त्यावेळी महाराष्ट्रात मुख्यमंत्री काँग्रेसचे होते आणि केंद्रातही काँग्रेसचेच सरकार होते याचा त्यांना सोयीस्कर विसर पडतो आणि आज काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसताना ते उबाठा गट मराठीचा कैवार घेत आहेत, ते काँग्रेसची बंदूक स्वतःच्या खांद्यावर घेऊन. काँग्रेसच्या पाठिंब्यावर उद्धव ठाकरे यांनी स्वतःचं सरकार स्थापन करण्याचे पाप केले आणि १०५ हुतात्म्यांचा अपमान केला. केवळ स्वतःचे दुकान चालू ठेवण्यासाठी काँग्रेसशी हातमिळवणी करताना उद्धव ठाकरे यांना मराठी



अस्मितेचा सोयीस्कर विसर पडला, हे महाराष्ट्रातील जनतेनं पाहिले आहे. १९९० च्या दशकात कोकणात रेल्वे आली, पण तेव्हा काँग्रेस सत्तेत नव्हती. तर मधू दंडवते आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यांच्या प्रयत्नातून कोकण रेल्वे सुरू झाली होती. तर आज २०१४ पासून कोकण रेल्वेवरील अनेक स्थानके आणि परिसराचा कायापालट होत आहे, ती सुसज्ज झाली आहेत ती भाजप सरकारच्या काळात. काँग्रेस सत्तेत असताना या कोकणासाठी त्यांनी काही केले नाही मात्र त्याच कोकणी माणसांच्या पाठिंब्यावर घेऊन उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पद पदरात पाडून घेतले ते मात्र काँग्रेसच्या कुबड्या घेऊनच हे विसरता येणार नाही. हिंदुत्वाशी केलेला हा द्रोह मतदार कधीच विसरणार नाहीत. मुंबई महापालिकेची निवडणूक आली की मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार यासारखी भाषा ऐकू येऊ लागते. कोणतेच सरकार मुंबई महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही, हे ठाकरे बंधुंना चांगले ठाऊक आहे तरीही 'मुंबई तोडणार'चा राग आळवला जातो. या दोघा बंधुंना आपण मराठीसाठी का केले, हे सांगता येत नसल्याने पुन्हा 'मुंबई तोडणार'चा आक्रोश होतो. उबाठा आणि मनसे हे इतरांपेक्षा जास्त मराठीचे कैवारी कसे काय झाले आहेत? याचं उत्तर शोधण्याचा कुणी प्रामाणिक प्रयत्न केला आहे का? महाराष्ट्रात जन्मलेला अमराठी भाषिक आपण अमराठी आहोत म्हणून भाजपात जाऊ असा विचार करून भाजपात येत नाही. तर इतर पक्षांमध्ये नेतृत्व, विचारधारा आणि भवितव्य



**संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर देशभर प्रसिद्ध झालेली डोंबिवलीची गुढीपाडव्याला निघणारी नववर्षाची शोभायात्रा हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पार्टी व संघ परिवारातील अन्य संघटनांनी सुरू केलेला उपक्रम आहे. मराठी नववर्षानिमित्त ठाकरे बंधूंनी असा काही उपक्रम सुरू केल्याचे मराठी माणसाला आठवणार नाही. फक्त राजकारणासाठी ठाकरे बंधूंना मराठी माणूस आणि मराठी यांची आठवण होते.**

मर्यादित आहे, म्हणून तो भाजपात येतो, हे वास्तव आहे.

भाजपाने मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी माणसासाठी ठोस काम केले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी देवेंद्र फडणवीस आणि भाजपाच्या नेत्यांनी सातत्याने केंद्र सरकारच्या पातळीवर पाठपुरावा केला. अभिजात भाषेचा दर्जा माझ्या माय मराठीला मिळाला तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच पाठपुराव्यामुळेच हे मान्य करावेच लागेल.

मुंबईतील बीडीडी चाळींमधल्या मराठी बांधवांना हक्काचे घर मिळाले ते केवळ देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने पुढाकार घेतल्यामुळेच शक्य झाले आहे. कारण निवडणूक आली की ठाकरे बंधूंना मराठी माणूस आठवतो, नाहीतर ५ वर्षे ते मराठी हा शब्द पण विसरलेले असतात. महापालिकेची कंत्राटे देताना उद्धव ठाकरे यांना परप्रांतीय कॉन्ट्रॅक्टरच लागतात, पण गेल्या ३० वर्षात मुंबईतील मराठी माणसासाठी त्यांनी नेमके काय केले आहे हे जाहीररीत्या सांगण्याचे धाडस करावे असे आव्हान त्यांनी उबाठा सेनेला दिले. भाजपाचे मराठी संस्कृतीतील स्थान हे प्रत्येक मराठी माणसाला माहिती आहे. आज संपूर्ण देशात ज्याच्या अत्यंत गौरवाने उल्लेख केला जातो, ती गुढी पाडव्याची भव्य हिंदू नववर्ष शोभायात्रा ही डोंबिवलीतील संघ-भाजप कार्यकर्त्यांचीच संकल्पना आहे, जी आज संपूर्ण महाराष्ट्राला प्रेरणादायी ठरली आहे. तुम्ही म्हणजे मराठी माणूस नाही आणि तुम्ही म्हणजे मुंबई नाही. याचा उल्लेख वारंवार देवेंद्रजी करतात मात्र हे सत्य स्वीकारण्याची मानसिकता आणि वैचारिक तयारी उबाठा नेत्यांची नाही हे दुर्दैव आहे.

शिवसेनेची मी मराठी ही ओळख बदलून मी मुंबईकर ही संकल्पना मुंबईतील मराठी माणसाच्या डोक्यावर कोणी लादली? मुंबईची मराठी ओळख पुसण्याचे पातक मी मुंबईकरच्या मोहिमेतून उद्धव ठाकरे यांनीच केले आणि हे बदल बाळासाहेब ठाकरे यांना मान्य होते का? याचं प्रामाणिक उत्तर देखील उद्धव ठाकरे यांनी द्यावे. मराठी माणसाचा सन्मान, भाषा, संस्कृती आणि भवितव्य यावर केवळ भावनांचे बुडबुडे निर्माण करण्यापेक्षा, यासर्व गोष्टींसाठी घोषणांपेक्षा काय काम केले आहे ते महत्त्वाचे असते आणि ते काम फक्त भाजपानेच करून दाखवले आहे, हे देखील सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. ■

# मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांचा राज्यभर झंझावती प्रचार















## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रचाराचा धडाका

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील २९ महानगरपालिकांमधील निवडणुकांच्या प्रचारासाठी झंझावती दौरा केला. राज्यातील सर्वच महापालिका निवडणुकांमध्ये प्रचार सभांचा धडाका लावला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व महापालिका निवडणुकांमध्ये ३७ प्रचार सभा घेतल्या आणि २७ मुलाखती दिल्या.








## प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी घेतल्या राज्यात ३५ सभा

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी राज्यातील २९ महानगरपालिकांमधील निवडणुकांच्या प्रचारासाठी झंझावती दौरा केला. राज्यातील सर्वच महापालिका निवडणुकांमध्ये प्रचार सभांचा धडाका लावला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी राज्यातील सर्व महापालिका निवडणुकांमध्ये ३५ प्रचार सभा घेतल्या, तर २५ ते ३० प्रचार रॅलीमध्ये प्रदेशाध्यक्ष सहभागी झाले होते.

# इन्फ्रा मॅन देवेंद्र फडणवीस



## महामुंबई वाहतूक व्यवस्थेच्या नव्या युगाचे शिल्पकार!

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीए अंतर्गत साधारण १२ हजार कोटी रुपयांचे १९ वाहतूक आणि दळणवळणाशी संबंधित मुंबईचे विकास प्रकल्प मंजूर केले आहेत. २०४७ पर्यंत एमएमआरडीए क्षेत्रातून जवळपास १.५ ट्रिलिअन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा त्यांचा रोडमॅप तयार आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार, ग्रीन ट्रान्सपोर्ट सिस्टिम्स, मुंबई ट्रान्सपोर्ट मॉडर्नायझेशन आणि मल्टी-मोडल इंटिग्रेशनचा समावेश असलेली सर्वसमावेशक योजना तयार करण्यात आली. वाढत्या प्रदूषणावर आळा घालण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीतील तब्बल ९० टक्के प्रणालीचे विद्युतीकरण करण्याची योजना आहे. त्याचबरोबर विविध गोष्टींसाठी वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेपैकी ७० टक्के ऊर्जा पुनर्वापराद्वारे मिळवण्याचा प्लॅन तयार केला जात आहे.

> मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा (एमएमआरडीए)च्या माध्यमातून महामुंबई परिसरात दळणवळण आणि वाहतुकीमध्ये सुधारणा करण्यासाठी इन्फ्रा मॅन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांद्वारे मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवण्याचा संकल्प केला होता. हा संकल्प आता प्रत्यक्षात पूर्ण होण्याच्या मार्गावर येऊ लागला आहे. महामुंबईतील वाहतूक व्यवस्थेच्या या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः लक्ष ठेवून आहेत आणि हे प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी खाजगी गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सक्रिय वापर करत आहेत.

## मुंबई मेट्रो



महामुंबईतील मेट्रो नेटवर्क हे या वाहतूक क्रांतीचे केंद्रबिंदू ठरत आहे. सध्या ३३७ किलोमीटर लांबीचे मेट्रो जाळे एमएमआरडीए रिजनमध्ये उभारले जात आहे. मुंबई मेट्रोच्या १, २, ३, ७ आणि ८ या पाच लाईन्स फुल स्विंगमध्ये सुरू झाल्या आहेत, तर २बी आणि ९ या लाईन्सची चाचणी सुरू आहे. मेट्रो नेटवर्कच्या या विस्तारामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होत आहे. प्रवासाचा कालावधी कमी होत आहे. प्रदूषणातही घट होत असल्याचे दिसून येत आहे. नुकतीच सुरू झालेली मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो मुंबई मेट्रो ३ (ॲक्वा लाईन) या मार्गाला प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एमएमआरडीएने मुंबईतील मेट्रो प्रकल्पाची कामे मार्गी लावण्यासाठी जवळपास १०,९७० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यातून विविध मेट्रो मार्गांच्या नेटवर्क विस्ताराचे आणि संबंधित सुविधा प्रकल्पांचे काम गतीने पूर्ण केले जाणार आहे.

## कोस्टल रोडमुळे मुंबईच्या सौंदर्यात भर!



कोस्टल रोडच्या अंतिम टप्प्याचे ऑगस्ट २०२५ मध्ये लोकार्पण झाल्यानंतर संपूर्ण कोस्टल रोड १५ ऑगस्ट २०२५ पासून नागरिकांसाठी २४ तास खुला करण्यात आला आहे. या रोडमुळे मुंबईकरांचा प्रवास अधिक जलद आणि सुलभ झाला आहेच, पण त्याचबरोबर शहराच्या सौंदर्यातही मोठी भर पडली आहे. कोस्टल रोडलगतचा परिसर सुशोभित करण्यात आला असून, सायकल ट्रॅक आणि पादचाऱ्यांसाठी भुयारी मार्ग उभारले गेले आहेत. या रस्त्यामुळे मुंबईकरांचा फक्त वेळ वाचत नाही, तर त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधांचा अनुभव घेता येत आहे. एमएमआरडीएच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मुंबईसाठी जागतिक मापदंडांनुसार पायाभूत सुविधा प्रकल्प साकार होत आहेत. बीकेसीमधील नियोजित सहा एक्झिट पॉईंट्सपैकी पाच पूर्ण झाले असून, शेवटचा पॉईंट डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार आहे. नवीन लिंक ब्रिज, बोगदे, उड्डाणपूल आणि २१५ मीटर लांबीचा केबल-स्टे ब्रिज या प्रकल्पांमुळे शहरातील वेगवेगळ्या भागात पर्यायी मार्ग उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे मुंबईकरांना सिग्नल-फ्री प्रवास शक्य होत आहे. शहरातील गर्दीच्या मार्गांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ लागला आहे.

## मुंबई वन ॲप




महामुंबईतील वाहतूक व्यवस्थेला डिजिटल स्वरूप देण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीए अंतर्गत 'मुंबई वन ॲप' ही नवी सुविधा आणली आहे. या ॲपद्वारे मुंबई महानगर प्रदेशातील ११ सार्वजनिक वाहतूक सेवा, मुंबई मेट्रो, उपनगरी रेल्वे, मोनोरेल आणि मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, मीरा-भाईंदर येथील बससेवा या सर्व एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकत्र आणल्या आहेत.

दररोज लाखो प्रवासी या वाहतूक साधनांचा वापर करतात, ज्यासाठी त्यांना अनेक ॲप्स, वेगवेगळी तिकिटे आणि लांबच लांब रांगांचा सामना करावा लागत होता. परंतु आता हे सर्व बदलले आहे. या ॲपच्या मदतीने प्रवासी मेट्रो, लोकल ट्रेन, बस आणि मोनोरेलची तिकिटे एका ठिकाणी बुक करू शकतात, तसेच त्यांना सर्वात जलद, जवळचा आणि सोयीस्कर मार्ग हे ॲप दाखवते. यावरून एकच तिकीट वापरून सर्व वाहतूक साधनांचा उपयोग करता येतो, ज्यामुळे प्रवाशांचा वेळ, मेहनत आणि पैसा अशी सर्वांची बचत होत आहे. या ॲपमुळे प्रवाशांचे प्रवासाचे नियोजन सुलभ झाले आहे. लांबलचक रांगा, सुट्ट्या पैशांची समस्या आणि वेगवेगळे ॲप्स वापरण्याची गरज आता संपली आहे. हे ॲप मुंबईकरांसाठी एका नव्या डिजिटल युगाची सुरूवात झाली आहे.

## पॉड टॅक्सी बीकेसी–मुंबई



कुर्ला ते वांद्रे या दोन स्थानकांदरम्यान व्यावसायिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बीकेसी (बान्द्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स) मध्ये अनेक मोठमोठ्या कंपन्यांची, बँकांची अधिकृत कार्यालये आहेत. वेगवेगळ्या देशातील कॉन्स्युलेट या भागात आहेत. तसेच या भागात मुंबई उच्च न्यायालय प्रस्तावित आहे. बुलेट ट्रेनचे स्टेशन प्रस्तावित आहे. त्यामुळे या भागातील वर्दळ दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या वाहतूक सुविधांवर मोठा ताण येत आहे. कुर्ला व वांद्रे येथून अगदी काही मिनिटांचे अंतर असलेल्या बीकेसीत जाण्यासाठी मुंबईकरांना ताटकळत वाट पाहावी लागत आहे. यासाठी सरकारने इथे पॉड टॅक्सी सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. ही पॉड टॅक्सी ८.८० किमीची असणार असून, त्यावर ३८ स्टेशन्स असणार आहेत. या प्रत्येक पॉड टॅक्सीमध्ये ६ प्रवाशी बसू शकतात आणि ही पॉड टॅक्सी ४० किमी प्रतितास वेगाने धावू शकते. हा प्रकल्प सार्वजनिक–खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर राबवला जाणार आहे. ही सेवा लवकरात लवकर सुरू व्हावी. तसेच बीकेसीचे व्यावसायिक महत्त्व लक्षात घेऊन पॉड टॅक्सीची सेवा जागतिक दर्जाची राहील, यावर राज्य सरकारकडून विशेष भर दिला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सप्टेंबर महिन्यात प्रस्तावित पॉड टॅक्सीच्या कामाचा आढावा घेऊन त्याला चालना देण्याचे निर्देश दिले आहेत.






मुंबईतील मेट्रो लाईन्स, उपनगरी रेल्वे सेवांतील सुधारणा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली 'मुंबई इन ५९ मिनिट्स' ही संकल्पना आता वास्तवात उतरू लागली आहे. येत्या काही महिन्यांत नवीन मेट्रो मार्ग टप्प्याटप्प्याने सुरू होतील, ज्यामुळे मुंबईकरांचा प्रवास आणखी वेगवान, सोयीस्कर आणि ताणमुक्त होईल. यासोबतच मानखुर्द मंडाले येथील मेट्रो ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आणि मालवणीतील कर्मचारी निवास प्रकल्पांमुळे मेट्रोच्या कार्यक्षमतेत आणि सेवा गुणवत्तेत मोठी सुधारणा अपेक्षित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टी नेतृत्वामुळे मुंबई महानगर प्रदेश आज खऱ्या अर्थाने एका नव्या युगात प्रवेश करत आहे. ■

# मुंबई महानगर क्षेत्रातील विकास प्रकल्प

## अटल सेतू



मुंबई आणि नवी मुंबई यांना समुद्रावरून थेट जोडणारा २१.८ किलोमीटर लांबीचा ६ लेन समुद्री सेतू प्रकल्प, ज्याला मुंबई ट्रान्स-हार्बर लिंक (MTHL) असेही म्हणतात, मार्च २०१८ मध्ये सुरू झाला आणि १३ जानेवारी २०२४ रोजी सामान्य वाहतूक सेवेसाठी त्याचे लोकार्पण झाले. या सेतू मुळे मुंबई ते नवी मुंबई प्रवासाचा कालावधी सुमारे दोन तासांवरून २०-२५ मिनिटांवर आला आहे, त्यामुळे दररोज लाखो कामगार, व्यापारी आणि प्रवासी वेळ व इंधन वाचत आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी झाली असून जवळपास दोन कोटीहून अधिक नागरिकांना दीर्घकालीन फायदे मिळत आहेत.

## बीडीडी चाळ पुनर्विकास (वरळी, नायगाव, परळ)

ब्रिटिश काळात १९२०-३० दरम्यान बांधलेल्या बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प डिसेंबर २०१८ मध्ये सुरू झाला. या प्रकल्पात वरळी, नायगाव आणि परळ येथे मिळून सुमारे २०७ चाळींचा समावेश आहे. सुमारे १६००० पेक्षा जास्त कुटुंबे या चाळींमध्ये राहत होती. जुन्या १६०-१८० चौ.फुटांच्या घरांऐवजी प्रत्येक लाभार्थ्याला सुमारे ५००-५५० चौ.फुटांचे



आधुनिक घर देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात वरळी व नायगाव येथे २० हून अधिक इमारती पूर्ण झाल्या असून कुटुंबे नव्या घरात स्थलांतरित झाली आहेत. या प्रकल्पात एकूण ३३-३५ मजली इमारती, लिफ्ट, फायर सेफ्टी, पार्किंग, पाणीपुरवठा व मोकळ्या जागांचा समावेश आहे. मुंबईतील मध्यमवर्गीय पुनर्विकासातील हा सर्वात मोठा सरकारी प्रकल्प मानला जातो.

## कोस्टल रोड



मुंबईतील पश्चिम किनारपट्टीवरून जाणारा जलद वाहतूक मार्ग कोस्टल रोड प्रकल्प २०१८ मध्ये सुरू झाला आणि टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहे. हा प्रकल्प दररोज सुमारे दोन लाखाहून अधिक वाहनचालकांसाठी ट्रॅफिक कमी करतो आणि मुंबईतील प्रमुख भागांना वेगाच्या मार्गाने जोडतो. ठाकरेंचा या प्रकल्पाशी काडीमात्र संबंध नाही हे दाखवून देणारी संपूर्ण टाईमलाईनची पोस्ट मी याआधी टाकली आहे.

## धारावी पुनर्वसन



धारावी, आशियातील एक मोठा स्लम क्लस्टर येथे पुनर्विकास कार्यक्रम राबवला जातोय ज्यात जागतिक दर्जाची सुधारणा, पूर्वीच्या कालव्यांपासून सुरक्षित घरं, सीवरेज, पाणी पुरवठा आणि सार्वजनिक सुविधा दिल्या जात आहेत. या प्रकल्पामुळे हजारो कोटींच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे आणि एकूण ४-५ लाखांहून अधिक रहिवाशांना एक सन्मानपूर्वक जीवन मिळण्याची दृष्टी आहे.

## फ्लायओव्हर नेटवर्क



शहरातील विविध मार्गांवर उड्डाणपूलांचे नेटवर्क (जसे अंधेरी, मालाड, घाटकोपर इ.) वाढवले आहे. या पुलांमुळे दैनंदिन वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे आणि प्रवासाचा वेळ सामान्यतः १५-३० मिनिटे वाचतो, ज्याचा फायदा किमान दोन ते तीन लाख वाहनचालक रोज मिळवतात. यातील बहुतांश कामे ठाकरेंची बीएमसीची टर्म संपल्यानंतर शक्य झाली हे विशेष!

## ईस्टर्न वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट



मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीच्या सुमारे १००० एकर जमिनीपैकी पहिल्या टप्प्यात अंदाजे ३०० एकर क्षेत्राचा विकास नियोजन टप्प्यातून पुढे आला आहे. या प्रकल्पात कार्नाक बंदर, माझगाव, भाऊचा धक्का परिसराचा समावेश आहे. उद्दिष्ट म्हणजे पूर्व मुंबईत सार्वजनिक खुल्या जागा, क्रूझ टर्मिनल, वॉटरफ्रंट रोड, पर्यटन व व्यावसायिक झोन तयार करणे. या विकासामुळे भविष्यात दरवर्षी लाखो पर्यटक आणि हजारो थेट-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. पूर्व मुंबईतील अनेक दशके बंद असलेला समुद्रकिनारा पहिल्यांदाच मुंबईकरांसाठी खुला होणार आहे.

## गोरेगाव-मुलंड लिंक रोड



गोरेगाव पश्चिम ते मुलुंड पूर्व जोडणारा सुमारे १२.२ किलोमीटर लांबीचा हा महत्त्वाचा ईस्ट-वेस्ट कनेक्टर जानेवारी २०२४ मध्ये प्रत्यक्ष बांधकाम सुरू आहे, हवाहवाई नाही. यातील सुमारे ६.६ किलोमीटर बोगद्याचा समावेश संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून होतो. हा रस्ता पूर्ण झाल्यावर गोरेगाव ते मुलुंड प्रवास ९० मिनिटांवरून सुमारे २० मिनिटांत होईल. दररोज अंदाजे १.५ ते २ लाख वाहनांना याचा फायदा होईल. JVLR, LBS मार्ग आणि थएकवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना




मुंबईत प्राथमिक आरोग्य सेवा थेट वस्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी 'आपला दवाखाना' ही संकल्पना राबवण्यात आली. फेब्रुवारी २०२३ पासून मुंबईत या दवाखान्यांची सुरुवात झाली. अल्प उत्पन्न गट, झोपडपट्टी व मध्यमवर्गीय मुंबईकरांसाठी मोफत OPD, तपासणी आणि औषधे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. २०२५ पर्यंत मुंबईत सुमारे २०० हून अधिक 'आपला दवाखाने' सुरू झाले असून दररोज अंदाजे ६०००० ते ७०००० रुग्णांना सेवा दिली जाते. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, ताप, संसर्गजन्य आजार, प्राथमिक चाचण्या आणि मोफत औषधे दिली जातात. मोठ्या सरकारी रुग्णालयांवरील ताण कमी झाला असून गरीब मुंबईकरांना उपचारासाठी दूर जावे लागण्याची गरज उरलेली नाही. ठाकरेंनी वडिलांच्या स्मारकासाठी मुंबईचा महापौर बांगला लाटला, पण सामान्य मुंबईकरांसाठी वडिलांच्या नावाने असले काही करावे याचा कधी विचार पण केला नाही!

## पायाभूत सुविधा



२०१४ पासून मुंबईमध्ये रस्ते, पुले, मेट्रो, सी-लिंक, सार्वजनिक वाहतूक विस्तार, पाण्याचे नेटवर्क व सेनेटीशन प्रकल्प मोठ्या प्रमाणात केले गेले आहेत. यामुळे कार्यक्षमतेत सुधारणा झाली आहे आणि शहराचे आर्थिक उत्पादन क्षमता वाढली आहे ज्याचा फायदा एकूण मुंबईकरांसह उद्योगांना मिळाला आहे. याच विषयावर देवेंद्र फडणवीस यांचा १३६ सेकंदांचा शंकर महादेवन स्टाईल ब्रेथलेस विडिओ मी २ दिवसांपूर्वी पोस्ट केला आहेच!

## जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड



जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड (JVLR) चे रुंदीकरण आणि सुधारणा २०१६ मध्ये सुरू झाल्या. यामुळे पूर्व-पश्चिम ट्रॅफिक मूव्हमेंट पूर्वीपेक्षा चांगली झाली आणि प्रवासाचा कालावधी कमी झाला ज्याचा फायदा हजारो दैनंदिन प्रवाशांना झाला.

## कोळीवाडा डेव्हलपमेंट आणि संरक्षण धोरण



मुंबईतील सुमारे ४० पेक्षा जास्त कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र संरक्षण व विकास धोरण लागू करण्यात आले. यामध्ये वर्सोवा, माहिम, कुलाबा, मढ, गिरगाव कोळीवाड्यांचा समावेश आहे. सुमारे १.५ ते २ लाख कोळी समाजाशी संबंधित लोक या धोरणाचे थेट लाभार्थी ठरणार आहेत. या धोरणानुसार कोळीवाड्यांची मूळ रचना, मासेमारी हक्क, जेट्टी, सुकवण क्षेत्र (drying yards) जपून पुनर्विकास केला जात आहे. काही ठिकाणी पायाभूत सुविधा, अंतर्गत रस्ते व स्वच्छता सुधारणा सुरू झाल्या आहेत. ठाकरेंनी फक्त कोळी समाजाला आश्वासने दिली, केले काही नाही.

## सर्व लोकल एसी होणार



२०१६ पासून लोकल ट्रेन नेटवर्कमध्ये एसी लोकल, नवीन तंत्रज्ञान आणि वाढीव डबे यांचा समावेश झाला. दररोज सुमारे ७५-८० लाख लोकांच्या प्रवाश्यांसाठी या सुधारणा लाभदायक ठरल्या आहेत, प्रवास एकदम 'रापचिक' नाही पण आधीपेक्षा नक्कीच सुरक्षित आणि थोडा तरी आरामदायक झाला आहे. येत्या काळात सर्व लोकल ट्रेन्सना मेट्रोप्रमाणे दरवाजे व भाडेवाढ न करता संपूर्ण ट्रेन्स एसी करण्यात येणार ही भाजपची हमी आहे!

## मुंबई मेट्रो २ आणि ७



मुंबईतील मेट्रो २ आणि ७ लाईन्सचे काम २०१६ मध्ये सुरू झाले आणि पूर्णपणे कार्यान्वित झालेले आहेत. यामुळे मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांचा पश्चिम उपनगरांमधील प्रवासाचा वेळ ४० मिनिटांनी कमी झाला आहे आणि लोकल ट्रॅफिकवर ताणही कमी झाला आहे.

## एनडीआरएफ व आपत्ती व्यवस्थापन




२०१५ पासून मुंबईत पावसाळ्याच्या काळात NDRF च्या ४ ते ६ कायमस्वरूपी तुकड्या तैनात केल्या जातात. २६ जुलै २००५ नंतर अनेकदा '९ किलोमीटर उंच ढग' मुंबईवर बरसले अडूनही प्रथमच २०१९-२०२४ दरम्यान अतिवृष्टी होऊनही मोठ्या प्रमाणात जीवितहानी टळली. दरवर्षी सरासरी ३०० ते ५०० लोकांचे जीव वाचवण्याचे काम NDRF, अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी केले आहे!! आधुनिक पंपिंग स्टेशन, रिअल-टाइम पावसाचे डेटा सेंटर आणि जलद प्रतिसाद प्रणाली आणि NDRF यामुळे मुंबईकर फक्त 'स्पिरिट ऑफ मुंबई' वर अवलंबून न राहता प्रशासनावर पण विश्वास ठेवू लागले आहेत. प्रत्येक वेळी मुंबईची तुंबई झाल्यावर ठाकरे फक्त 'भरतीचा माज आणि ओहोटीची लाज' हेच गाणे वाजवत बसत होते.

## महालक्ष्मी सेंट्रल 'ऑक्सिजन' पार्क उपक्रम

डिसेंबर २०२५ मध्ये महालक्ष्मी रेसकोर्स व कोस्टल रोड परिसरात सुमारे २९५ एकराचा Central Oxygen Park विकसित करण्याची योजना सार्वजनिक केली गेली. यामध्ये हिरव्या क्षेत्र,



बोटॅनिकल गार्डन, खुल्या जागा आणि पर्यावरणीय जागरूकता केंद्र यांचा समावेश राहील. पूर्ण प्रकल्प सुरू आहे परंतु पूर्णपणे सार्वजनिक उपयोगासाठी अद्याप बांधकाम सुरू आहे. हे शहरातले एक मोठे हरित 'ऑक्सिजन-पार्क' म्हणून भविष्यात संपूर्ण मुंबईकरांना शुद्ध हवा व आरोग्यदायी खुला परिसर उपलब्ध करून देईल. आरेच्या जोडीला मुंबईसाठी ही नवीन फुफुसे ठरणार आहेत!

## प्रधानमंत्री आवास योजना (मुंबई)



२०१६ पासून मुंबई महानगर क्षेत्रात PMAY अंतर्गत सुमारे ३ लाख घरे मंजूर झाली आहेत. यातील मोठा भाग झोपडपट्टी पुनर्वसन, ट्रान्झिट कॅम्प आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आहे. आतापर्यंत अंदाजे १.५ लाख घरे प्रत्यक्ष लाभार्थ्यांना देण्यात आली आहेत. प्रत्येक घर साधारण ३००-४०० चौ.फुटांचे असून पाणी, वीज, शौचालयासह आहे. मुंबईतील घरांची टंचाई कमी करण्यासाठी हे पंतप्रधान मोदींचे महत्वपूर्ण योगदान आहे.

## काँक्रीट रस्ते

२०२२ पासून मुंबईत मोठ्या प्रमाणावर रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण सुरू झाले. पहिल्या दोन टप्प्यांत सुमारे



४०० ते ४५० किलोमीटर रस्ते काँक्रीटचे करण्यात आले. एकूण ७०० किलोमीटरपेक्षा जास्त रस्ते काँक्रीटचे करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे खड्डे, धूळ आणि वारंवार डांबरी कामाचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. दररोज सुमारे ८० लाख प्रवासी याचा प्रत्यक्ष फायदा घेत आहेत. ठाकरेंना हे बिल्कुल पसंद आलेले नाही, कारण त्यांना दरवर्षी नवीन टेंडर काढायची कामे आवडतात.

## छत्रपती शिवाजी महाराज स्थानकाचा पुनर्विकास



मुंबईतील प्रमुख रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण सुरूच आहे. CSMT चे जागतिक दर्जाचे पुनर्विकास काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याशिवाय लोकमान्य टिळक टर्मिनस (LTT), अंधेरी, गोरेगाव, बोरिवली, ठाणे इत्यादी अशा १० स्थानकांवर सुविधा सुधारणा झाल्या आहेत. दररोज सुमारे ७०-८० लाख प्रवाशांना याचा थेट फायदा होतो. नव्या फूटओव्हर ब्रिज, एस्कलेटर, डिजिटल साइनबोर्ड यामुळे प्रवासी अनुभव सुधारला आहे. ज्यांनी २०१५ च्या आधी रेल्वे स्थानकांवर एस्कलेटर व लिफ्टसारख्या गोष्टी पाहिल्या होत्या त्यांनी विरोधकांना व २०१५ नंतर ज्यांनी एस्कलेटर व लिफ्ट पाहिल्या त्यांनी भाजपला मतदान करावे, असा जर निकष ठरला तर मुंबईत एकही मत विरोधकांना मिळणार नाही. हे संपूर्ण १००% काम एकट्या भाजपने केले आहे!!

## स्मार्ट वाहतूक व्यवस्था



२०२१ पासून मुंबईत I-आधारित ट्रॅफिक सिग्नल प्रणाली लागू करण्यात आली. पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० हून अधिक चौकांवर स्मार्ट सिग्नल बसवले गेले. यामुळे काही प्रमुख मार्गांवर प्रवास वेळ १५-२५ टक्क्यांनी कमी झाला. अपघातप्रवण चौकांवर CCTV आणि ऑटोमेटेड चालान प्रणालीमुळे शिस्त वाढली आहे. रोज अंदाजे २०-२५ लाख वाहनचालक याचा फायदा घेत आहेत.

## बोगदा प्रकल्प



२०१९ पासून मुंबईत अनेक मोठे बोगदा प्रकल्प सुरू झाले. मेट्रो लाईन ३ मध्ये सुमारे ३३ किलोमीटर भूमिगत मार्ग असून तो देशातील सर्वात मोठ्या शहरी टनेल प्रकल्पांपैकी एक आहे. कोस्टल रोड प्रकल्पातही मोठ्या प्रमाणावर समुद्राखाली व जमिनीखाली बोगदे बांधले गेले आहेत. ही पोस्ट करत असताना मुंबईत अजून ७५ किलोमीटर टनेल रोड्सचे काम निर्माणाधिन आहे. यामुळे वरच्या रस्त्यांवरील ताण कमी होतो आणि भविष्यात वाहतूक अधिक सुरळीत होणार आहे.

## शहरी पूर नियंत्रण



मुंबईसाठी एक विस्तृत ड्रेनेज नेटवर्क BRIMSTOWD अंतर्गत उभारण्यात येत आहे. यामुळे पावसाळ्यात पूरधोका लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, ज्याचा फायदा मुंबईकरांच्या मालमत्ते व जीवितहानीपासून संरक्षणात झाला आहे. २०२५ मध्ये मुंबईची तुंबई झालीच नाही, ट्रेन्स बंद पडल्या नाहीत आणि जशी ही कामे पुढे जात आहेत २०२६-२७ पासून तर मुंबईची तुंबई होणारच नाही ही भाजपची गॅरंटी आहे!!

## वर्सोवा-वांद्रे सी लिंक



हा पूल बांद्रा-वर्सोवा कनेक्शन निर्माण करण्यासाठी आहे. हे काम वेगात सुरू असून, हा पूल पूर्ण झाल्यावर मुंबईच्या पश्चिम भागातील प्रवास १२० मिनिटांवरून १५ मिनिटांपर्यंत कमी करू शकेल ज्याचा फायदा नागरिकांना होईल. बांद्रा-वरळी सी-लिंक बनला, तेंव्हापासून ठाकरे या सी-लिंक ची आश्वासने देत आहेत पण ते पायउतार झाले तेंव्हा कुठे ही कामे सुरू होऊ शकली!

## पाणी पुरवठा



२०१७-१८ पासून मुंबईच्या पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यात आल्या. २०१९-२२ या काळात स्थगिती-सम्राट ठाकरेंनी खो घातला. २०२२ नंतर मुंबईला येणाऱ्या पाण्याचे गळती नियंत्रण, वर्षानुवर्षे सडलेल्या पाइपलाईन बदलून नवीन पाइपलाईन, नवीन पंपिंग स्टेशनची कामे केल्याने सुमारे २०-२५ टक्के पाण्याची बचत झाली आहे. याचा फायदा सुमारे १ कोटीहून अधिक मुंबईकरांना नियमित पाणीपुरवठ्याच्या स्वरूपात होत आहे. काही भागांत पाणी कपात लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

## युवकांसाठी रोजगार



२०१४ नंतर मुंबईतील मोठ्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांमुळे थेट आणि अप्रत्यक्ष मिळून अंदाजे २० लाख रोजगार निर्माण झाले आहेत. यात बांधकाम कामगार, अभियंते, तंत्रज्ञ, सुरक्षा कर्मचारी, वाहतूक, सेवा क्षेत्रातील नोकऱ्या यांचा समावेश आहे. मेट्रो, कोस्टल रोड, MTHL, पुनर्विकास प्रकल्पांमुळे मुंबईतील तरुणांना सातत्याने रोजगार उपलब्ध झाला आहे! नाही तर एकाची व्हिजन शिववडापाव गाड्या, तर दुसऱ्याने शिव उद्योग सेना बनवून नको तेच उद्योग केले.

## एक्स-प्रेस मोबिलिटी व्हिजन डॉक्युमेंट



नागरी वाहतूक आणि मल्टी-मोडल कनेक्टिव्हिटीचे नियोजन कसे असावे याचे क्लासिक टेक्स्ट-बुक उदाहरण म्हणजे इन्फ्रामॅन देवेंद्र फडणवीस यांचे यासंबंधीचे काम. लोकल, मेट्रो, रस्ते, विमानतळ, महामार्ग, सी-लिंक, जलवाहतुक यांची परफेक्ट सांगड घातल्याने पुढील काही वर्षांत वाहतूक सुलभता व प्रवासी अनुभवात मोठी सुधारणा निश्चितच होणार आहे.

## शून्य सहिष्णुता



२०२२ पासून देवेंद्र फडणवीस यांनी सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला असून, यामुळे अनेक प्रकल्प वेळेवर होऊ लागले किंवा त्याबद्दल उत्तरदायित्व ठेऊन कामे पुढे जात आहेत... ज्याचा थेट फायदा नागरिकांना सेवा आणि प्रकल्प वेळेत मिळाले. वेळेत कामे व्हावी एवढेच नाही, तर आज ही पोस्ट करत असताना पण साधारण ५ लाख कोटींचे प्रकल्प MMR मध्ये सुरू असताना - एकही रुपयाच्या भ्रष्टाचाराचा साधा आरोपही झालेला नाहीये! हाच तो झिरो-टॉलरन्स!!

# वाढवण बंदराजवळ विमानतळ का?



❶ वाढवण बंदर पूर्ण झाल्यावर ते भारताचे सर्वात मोठे बंदर आणि जगातील टॉप-१० मेगा पोर्ट्सपैकी एक असेल. अशा प्रकल्पाला विमानतळ लक्झरी नाही, तर अनिवार्य पायाभूत सुविधा आहे. मेगा पोर्ट म्हणजे मल्टी-मोडल हब हे समीकरण आहे.

आजच्या जगात मोठी बंदरे फक्त जहाजांपुरती मर्यादित नसतात. बंदर, रेल्वे, रस्ते, बुलेट-ट्रेन, विमानतळ यांचे ते एक इंटिग्रेटेड लॉजीस्टिक्स हब असते! प्रचाराला तर जात नाही, एकदा रॉटरडॅम, सिंगापूर, शांघाय ला जाऊन बघून या.

❷ इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर्स, फार्मा, मेडिकल इक्विपमेंट, डिफेन्स उपकरणे अश्या अनेक गोष्टी समुद्राने येतात, पण पुढे हवाई मार्गे न्यावे लागतात. यासाठी जवळच विमानतळ अत्यावश्यक असतो! मुंबईला आलेला कार्गो वाढवणला न्यायचा नाहीये साहेब, पण वाढवणला आलेला माल पण मुंबईला न्यायचा नाहीये!

❸ जागतिक कॉर्पोरेट्स, उएज, टेक्निकल एक्स्पर्ट्स वाढवण बंदरावर येत-जात राहणार आहेत. यात आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपन्या, ग्लोबल इन्व्हेस्टर्स, टेक्निकल एक्स्पर्ट्स यांची ये-जा सातत्याने असेल. त्यांनी नवी मुंबई एअरपोर्ट किंवा मुंबईवर अवलंबून राहणे अव्यवहार्य आहे.

❹ वाढवण हे अरबी समुद्रावरील सामरिक स्थान आहे. नेव्ही, कोस्ट गार्ड, लॉजिस्टिक सपोर्ट, आपत्कालीन हालचालींसाठी एअर स्ट्रिप/एअरपोर्ट ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज आहे.

❺ क्रू बदल (ऊीशु उहरपसश) आणि शिपिंग ऑपरेशन्स बद्दल तुम्हाला काही माहीत असेल असं मला वाटत नाही, पण दरवर्षी हजारो जहाज कर्मचारी बदलावे लागतात. आज सिंगापूर यामुळेच ग्लोबल हब आहे. विमानतळ नसल्यास वाढवण 'ट्रान्झिट पोर्ट' होऊ शकत नाही.

❻ **आपत्कालीन आणि आपदा व्यवस्थापन**

तेलगळती, सायक्लोन, जहाज अपघात, पर्यावरणीय



धोके यावेळी हेलिकॉप्टर, कार्गो विमाने, रेस्क्यू ऑपरेशन्स यासाठी जवळचा विमानतळ जीवन-मरणाचा प्रश्न ठरतो.

7 महाराष्ट्राला मुंबईवरचा भार कमी करायचा नाही, तर मुंबईला आधार द्यायचा आहे. मुंबई पोर्ट आणि मुंबई एअरस्पेस ओव्हरलोड झालेली आहे. मुंबई विमानतळावर आज कधीकधी विमान उडण्याच्या रांगेत १५वे, २०वे असते! अनेकदा तर ढग क्लियरन्स नसल्याने सगळे प्रवासी बसून बोर्डिंग संपल्यानंतर पण विमान, पायलट आणि प्रवासी जागेवरच वाट बघत बसलेले असतात.

8 फक्त बंदरापुरता नाही तर लॉजिस्टिक्स, वेअरहाऊसिंग, एव्हिएशन सर्व्हिसेस, MRO (Maintenance, Repair, Overhaul) मध्ये लाखो थेट-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे विमानतळ झाल्याने. पालघर जिल्ह्यातील तरुणांना नोकऱ्या मिळतील याचा तुम्हाला आनंद का नाही? राज्यातील सर्वात मागासलेल्या जिल्ह्यांपैकी एक असलेल्या पालघर जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलत असेल तर तुम्हाला काय त्रास आहे साहेब? याच मागासलेपणामुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मिशनरी फोफावले, त्यांना पण एयरपोर्ट नकोय. त्यांची री तुम्ही ओढताय हा योगायोग आहे की...?

9 **भविष्यातील विस्तार आजच पाहिला जातो.**

असा प्रकल्प ५०-१०० वर्षांचा विचार करून केला जातो. तुम्ही त्याचा लोड नका घेऊ साहेब. तुम्ही फक्त 'आजचा' विचार करणारे आहात. म्हणून गेल्या ४ निवडणुकीत तुम्ही कधी यांच्या बाजूने, कधी पलीकडून, कधी उमेदवार न देता प्रचार तर कधी भीती-मिलन - असे प्रयोग तुम्ही करत असता. ५०-१०० वर्षांचा विषय तुम्हाला नाही समजणार.

10 या क्षेत्रात चीन, सिंगापूर, दुबई आपल्यापेक्षा पुढे का आहेत? कारण तिथे बंदर, विमानतळ, लॉजीस्टिक्स, पॉलिसी सगळ्या गोष्टी एकत्र करून एक इकोसिस्टिम उभारलेली पाहायला मिळते. भारत पहिल्यांदाच अशी पूर्ण इकोसिस्टिम उभारत आहे!



# आमचे आदर्शस्थान स्वामी विवेकानंद

● **शिवप्रकाश,** राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

> १२ जानेवारी १८६३ रोजी त्यावेळच्या कलकत्ता येथे (आताचे कोलकाता) जन्मलेले नरेंद्रनाथ दत्त हे बालक काही वर्षांनी संपूर्ण जगात प्रसिद्ध पावेल अशी भविष्यवाणी कोणी केली नव्हती. मात्र नरेंद्रनाथ दत्त हे स्वामी विवेकानंद झाल्यावर त्यांनी भारत आणि हिंदू संस्कृतीचा झेंडा जगभर अभिमानाने मिरवला. स्वामी रामकृष्ण परहंस यांच्याकडून दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी विवेकानंद बनले.

**कृशाग्र** बुद्धी असलेल्या विवेकानंदांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध युवकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्यांनी समाज सुधारणेचे आणि धर्म प्रसाराचे, समरतेचे कार्य जोमाने केले. ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकाबो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत विवेकानंदांनी केलेले भाषण जगभर गाजले. 'माझ्या बंधू आणि भगिनींनो' या शब्दांनी विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. यातून विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीच्या वैश्विक स्वरूपाची जाणीव करून दिली. कोलंबस हा अमेरिकेला पोहचल्याच्या घटनेला ४०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शिकागो येथे या धर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्या ४०० वर्षाच्या काळात झालेली भौतिक प्रगतीचे दर्शन घडवणे तसेच ख्रिश्चन धर्माचा जगभर प्रसार करणे, अन्य धर्मापेक्षा ख्रिश्चन धर्म कसा श्रेष्ठ आहे हे दाखवणे, हा या परिषदेचा उद्देश होता. त्यानिमित्त मिशिगंध तलावाच्या चारीबाजूला भव्य चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला उपस्थित असलेल्या लाखो लोकांनी हे प्रदर्शन पाहिले.

या परिषदेत झालेल्या धर्म सभेत स्वामी विवेकानंदांनी आपल्या छोट्या भाषणात भारतीय संस्कृती, भारतीयत्वाचा व्यापक विचार याची ओळख घडवत हिंदू धर्माची पताका संपूर्ण जगभर डौलाने फडकवली. विवेकनंदांच्या भाषणाचे वृत्त अमेरिकेतील सर्व वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले. अमेरिकेच्या नागरिकांनी या भाषणाबद्दल स्वामी विवेकानंदांना हिंदू धर्माचा संन्यासी (मंक ऑफ हिंदू धर्म) ही उपाधी दिली. भारतीय संस्कृती संपूर्ण जगाला कुटुंब मानते. हे स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणातून साऱ्या जगाला सांगितले. हिंदू धर्मातील सहिष्णुतेचा विचार अन्य धर्मांपेक्षा किती व्यापक उद्दिष्टाचा आहे, हे ही विवेकानंदांनी आपल्या भाषणातून दाखवून दिले.

जागतिक व्यासपीठावर हिंदू धर्माची महती अशा अभिमानास्पद पद्धतीने मांडणाऱ्या स्वामी विवेकानंदांनी अन्य धर्मियांकडून चालू असलेल्या धर्मप्रसारासाठीच्या प्रयत्नांचा सुस्पष्टपणे उल्लेख केला. जगाच्या साधन



सामुग्रीवर कब्जा मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि आपल्या धर्माच्या प्रसारासाठी अन्य धर्मांना संपविण्याच्या हालचालींचाही विवेकानंदांनी आपल्या भाषणात समाचार घेतला होता. विवेकानंदांनी त्यावेळी वर्णन केलेली स्थिती काही वर्षांनी संपूर्ण जगाने अनुभवली. आजही धर्माच्या नावावर जगभर हिंसा होत आहे. या ना त्या मार्गाने बळजबरीने धर्म प्रसाराचे प्रयत्न जगभर चालू आहेत. या प्रयत्नांचे परिणाम मानवतेला दीर्घकाळ भोगावे लागतील, असा इशारा स्वामी विवेकानंदांनी दिला होता. यातून विवेकानंदांचे द्रष्टेपण दिसून येते. अन्य धर्मियांच्या धर्म प्रसारासाठीच्या हालचालींवर प्रखर टीका करणाऱ्या विवेकानंदांनी हिंदू धर्मातील अनिष्ट, कालबाह्य चाली रीतींवरही जोरदार प्रहार केला होता. अस्पृश्यतेसारखी प्रथा ही आपल्या धर्मावरील कलंक आहे. अस्पृश्यतेसारख्या प्रथेमुळे हिंदू धर्माचे मोठे नुकसान झाले आहे, असेही स्वामी विवेकानंद म्हणत असत. हिंदू धर्मातील अस्पृश्यतेसारखी प्रथा संपुष्टात आणण्यासाठी अनेक महापुरुषांनी प्रयत्न केले. तरीही समरस हिंदू समाजाचे स्वप्न अजून साकार झालेले नाही.

सध्या संपूर्ण देशात लव-जेहाद, लॅण्ड जेहाद, घुसखोरी, धर्मांतर अशा वेगवेगळ्या मार्गांनी धर्म प्रसाराचे प्रयत्न सुरू आहेत. यावेळी विवेकानंदांच्या द्रष्ट्या विचारांचे स्मरण होते. विवेकानंद म्हणाले होते, 'ज्यावेळी एक हिंदू आपला धर्म सोडून अन्य धर्म स्वीकारतो त्यावेळी हिंदुंची संख्या एकाने कमी होत नाही तर देशाच्या शत्रूची संख्या एकाने वाढते.' शिकागोतील भाषणात स्वामी विवेकानंदांनी ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या धर्मांतरांच्या प्रयत्नाबद्दल चिंता व्यक्त करताना सांगितले होते की, एखाद्या समाजातील दारिद्र्याचा, गरीबीचा गैरफायदा घेऊन त्या धर्मातील लोकांना प्रलोभन दाखवून त्यांचे धर्मांतर करणे ही सेवा नाही तर हा व्यापार आहे. विवेकानंदांच्या त्या भाषणाला १३३ वर्षे झाली आहेत. मात्र ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्म प्रसारकांचे धर्मांतराचे प्रयत्न अजूनही थांबले नाहीत. यावरून स्वामी विवेकानंद हे काळाच्या पुढचा विचार करत होते हे दिसून आले. देशातील युवकांनी भारताच्या प्रगतीसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण घ्यावे, असे ते सांगत असे. ख्यातनाम उद्योगपती जमशेदजी टाटा यांच्याबरोबर स्वामी विवेकानंदांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी काय करता येईल, याची चर्चा केली होती. जमशेदजी टाटा यांनी स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेने भारतीय विज्ञान संस्थेची स्थापना केली होती. टाटा स्टीलच्या स्थापने मागेही विवेकानंदांची प्रेरणा होती. विदेशातून तंत्रज्ञान आयात करून देशातील गरीबी संपणार नाही, त्यासाठी आपल्याला स्वत:च्या तंत्रज्ञानाचा विकास करावा लागेल, असे मत विवेकानंदांनी व्यक्त केले होते. याच विचारांच्या आधारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली आहे. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' असा संदेश स्वामी विवेकानंदांनी भारतातील युवापिढीला दिला होता. याचा अर्थ तरुणांनी जागे होऊन आपले उद्दिष्ट साध्य होईपर्यंत थांबू नये, असा आहे. युवकांचे देशाच्या उभारणीतील आणि प्रगतीतील महत्वाचे स्थान स्वामीजींना ठाऊक होते. त्यामुळेच ते म्हणत असत, 'माझा देशातील युवापिढीवर विश्वास आहे. राष्ट्रनिर्माणाचे आवश्यक कार्य ही पिढीच करेल.' युवकांनी शारीरिक सुदृढतेवर भर द्यावा तसेच सेवाभावाने वंचितांची सेवा करावी, इंग्रजांच्या मानसिक गुलामगिरीतून बाहेर यावे, असे स्वामी विवेकानंद सांगत असत. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील अनेक क्रांतिकारकांनी स्वामी विवेकानंदांपासून प्रेरणा घेतली होती. वेगवेगळ्या मार्गाने विवेकानंदांनी निद्रिस्त समाजातील भारतीयत्वाचा आत्मा जागविण्याचा प्रयत्न केला, अशा शब्दात लोकमान्य टिळकांनी स्वामी विवेकानंदांची प्रशंसा केली होती. स्वामी विवेकानंदांनी ज्या संकल्पासाठी आपले जीवन व्यतीत केले तो संकल्प पूर्ण करणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल. ■

# विकसित भारतासाठी तरूणांचे सक्षमीकरण!



● डॉ. मनसुख मांडविया

भारत स्वातंत्र्याच्या शताब्दीच्या दिशेने वाटचाल करत असताना देशाला मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस असलेल्या आणि त्या स्वप्नांना प्रत्यक्ष कृतीत परावर्तित करण्याचा दृढनिश्चय केलेल्या तरुण वर्गाच्या सक्रिय सहभागाची गरज आहे. 'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद' ही मोहीम या उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे...

**भारताची** विकासगाथा अशा लोकांद्वारे लिहिली जाईल, जे आज यातील विचारांना मूर्त रूप देत आहेत. संपूर्ण देशात, तरुण भारतीय याबद्दल सखोल विचार करत आहेत की, भारत कशा प्रकारे वेगाने पुढे जाऊ शकेल, कशा प्रकारे अधिक चांगले शासन करू शकेल आणि २०४७ पर्यंत कशा प्रकारे विकसित देश होईल. त्यांचे विचार विद्यापीठ परिसर आणि समुदाय, नवउद्योग, खेळाची मैदाने, वर्गखोल्या आणि गावांतील बैठकांमध्ये उमटताना दिसतात. खरा प्रश्न आता हा राहिलेला नाही की, तरुणांकडे योगदान देण्यासाठी काही आहे का, खरा प्रश्न असा आहे की, त्यांना राष्ट्राच्या वाटचालीला दिशा देण्याची संधी मिळावी, यासाठी सशक्त मंच उपलब्ध आहे का. 'विकसित भारत युवा नेता संवाद' (व्हीबीवायएलडी), हा उपक्रम अशाच प्रकारचा मंच प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. आज भारतात जगातील सर्वात जास्त तरुण आहेत. त्यामुळे साहजिकच राष्ट्राच्या भविष्याची दिशा केवळ धोरणे किंवा संस्थांद्वारे नाही, तर येथील तरुण नागरिकांची कल्पनाशक्ती, दृढ विश्वास आणि धैर्याने निर्धारित होईल. विशाल युवाशक्तीचे हे भांडार हा केवळ लोकसंख्या शास्त्रीय लाभ नाही, तर ही भारताची सर्वांत मोठी राष्ट्रीय संपत्ती आहे जी नवोन्मेषाला गती देण्यासाठी, लोकशाही मजबूत करण्यासाठी आणि देशाला सर्वसमावेशक व शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी

सक्षम आहे.

आजचा तरुण केवळ वैयक्तिक प्रगतीने प्रेरित होत नाही; तर तो जबाबदारी घेण्याच्या आणि सार्थ प्रभाव पाडण्याच्या इच्छेनेदेखील प्रेरित होतो. ते अशा मार्गांचा शोध घेतात, जिथे त्यांच्या सर्जनशीलतेचे रूपांतर तोडग्यांमध्ये होईल, त्यांच्या ऊर्जेचे रूपांतर नेतृत्वात आणि महत्त्वाकांक्षेचे सेवेत होऊ शकेल. 'युवा व्यवहार आणि क्रीडामंत्री' म्हणून माझ्या कार्यकाळात, मला विविध पार्श्वभूमीच्या म्हणजे विद्यापीठ परिसर, ग्रामीण जिल्हे, क्रीडा मैदाने आणि सामुदायिक उपक्रमांमधील – तरुण भारतीयांशी संवाद साधण्याची संधी मिळाली आहे. त्यातून तरुण देशाच्या भविष्याबद्दल किती गांभीर्याने विचार करतात, हे स्पष्टपणे जाणवते. मला तो प्रसंग आठवतो जेव्हा मी ग्रामीण भागांतील तरुण स्वयंसेवकांच्या एका गटाला भेटलो होतो. त्यांनी आपल्या गावांमध्ये अनौपचारिक शिक्षण केंद्र सुरू केले होते. मर्यादित संसाधने असूनही, दृढ विश्वासाच्या जोरावर ते शिक्षण आणि कौशल्य विकासातील उणिवांवर स्थानिक पातळीवर काढलेल्या उपायांद्वारे तोडगा काढत होते. त्यांचे विचार व्यावहारिक होते, जमिनीवरील वास्तवाशी जोडलेले होते आणि जबाबदारीची जाण त्यांना होती. अशा प्रकारचे अनुभव हे स्पष्ट करतात की, जेव्हा तरुणांवर विश्वास ठेवला जातो आणि त्यांना संधी दिली जाते, तेव्हा ते केवळ सहभागी होत नाहीत, तर नेतृत्व करतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून असे आवाहन केले होते की, ज्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही, अशा एक लाख तरुणांना सार्वजनिक जीवनात आणले जावे. पंतप्रधानांच्या याच भावनेतून प्रेरणा घेऊन जानेवारी २०२५ मध्ये 'विकसित भारत युवा नेता संवाद' कार्यक्रमाचा आरंभ करण्यात आला, ज्यामध्ये राष्ट्रीय युवा महोत्सवाची संकल्पना पूर्णपणे नवीन स्वरूपात मांडण्यात आली आहे. याला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. 'विकसित भारत' संदर्भातील आवाहन केल्यानंतर ३० लाखांहून अधिक तरुणांनी त्यात सहभाग घेतला. दोन लाखांपेक्षा जास्त निबंध सादर केले गेले आणि हजारो तरुणांनी राज्य स्तरावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचा समारोप दिल्लीच्या भारत मंडपम येथे झाला, जिथे तीन हजार तरुणांना पंतप्रधानांशी मनमोकळेपणाने संवाद साधण्याची संधी मिळाली. पंतप्रधानांनी त्यांचे विचार ऐकून घेतले आणि त्यांना नेतृत्व करण्याचे आवाहन केले.

आकडेवारीच्या पलीकडे जाऊन पाहिले, तर सहभागाच्या स्वरूपामुळे हा संवाद खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरल्याचे दिसते. २०४७ च्या भारताच्या उभारणीत भारताच्या तरुणांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत, यावर या उपक्रमातून शिक्कामोर्तब झाले. तरुण स्पर्धकांना राष्ट्रीय आव्हानांबद्दल गांभीर्याने विचार करण्यासाठी, त्यावर उपाय सुचवण्यासाठी आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला सामायिक उद्देशाशी जोडण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले, ज्यामुळे आकांक्षा आणि अंमलबजावणी यांच्यातील अंतर संपुष्टात आले.

विकसित भारत युवा नेतृत्व संवाद या उपक्रमाची खरी ताकद केवळ त्याच्या व्याप्तीत नाही, तर त्याच्या आखणीमध्येही आहे. या उपक्रमाच्या स्वरूपातच विचार, भाषा, संस्कृती आणि अनुभवांच्या विविधतेचा अंतर्भूत आहे. यानिमित्ताने शहरी आणि ग्रामीण भारतातील तरुण, विद्यार्थी आणि व्यावसायिक, नवोन्मेषी आणि तळागाळातील नेतृत्व एकाच व्यासपीठावर येते. या उपक्रमात अनेक स्तरांतील सहभाग दिसून येतो. त्यामुळेच भौगोलिक परिस्थिती, भाषा किंवा पार्श्वभूमीमुळे कोणत्याही विचारांना बगल दिली जाणार नाही, उलट संवादाच्या अशा स्वरूपामुळेच सहभागी होणाऱ्या प्रत्येक तरुण प्रतिनिधीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी मिळेल आणि त्यांच्या विचारांची व्याप्ती वाढवण्यासाठी एक व्यासपीठही उपलब्ध होईल.

भारतातील तरुण पिढीने देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यापासून ते स्वतंत्र भारतातील संस्थांच्या उभारणीपर्यंत, राष्ट्र उभारणीच्या प्रत्येक निर्णायक क्षणात कायम मुख्य भूमिका पार पाडली आहे. प्रत्येक वळणावर, भारतीय तरुण धाडस, आत्मविश्वास आणि नेतृत्व करण्याच्या इच्छेने पुढे आला आहे. आज देश पुन्हा एकदा तरुण वर्गाकडे अपेक्षेने पाहत आहे, अर्थात ही अपेक्षा केवळ सहभागापुरती मर्यादित नाही, तर ती विकसित भारताचे सहनिर्माते म्हणून नेतृत्व करण्यासाठी आणि या वाटचालीला गती देण्यासाठीची आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचे स्वप्न केवळ आर्थिक प्रगतीपुरते मर्यादित नाही, तर त्याअंतर्गत सामाजिक सलोखा, पर्यावरणीय जबाबदारी, तंत्रज्ञानविषयक मार्गदर्शन आणि सर्वसमावेशक

विकासही साधणे गरजेचे आहे. या जटिल आव्हानांचा सामना करण्यासाठी नवे विचार, परिस्थितीशी जुळवून घेण्याची लवचीकता आणि नवोन्मेषाचा अवलंब करण्याची क्षमता गरजेची आहे आणि हे सर्व गुण भारताच्या तरुणांत ठळकपणे दिसून येतात.



या उपक्रमाच्या पहिल्या आवृत्तीच्या दमदार यशाच्या बळावरच, विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ चे आयोजन ९ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. या आयोजनातून या राष्ट्रीय युवा परिषदेने एका जागतिक व्यासपीठाच्या दिशेनेच निर्णायक झेप घेतली आहे आणि त्याचे पडसाद जगभरात उमटत आहेत. भारतासाठी डिझाईन आणि विकसित भारतासाठी तंत्रज्ञान यांसारख्या नवीन उपक्रमांमुळे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील युवा अनिवासी भारतीयांच्या सहभागामुळे, या संवादाची व्याप्ती आता देशाच्या सीमा ओलांडून त्यापलीकडे पोहोचली आहे. असे असले तरी, युवा वर्गाला धैर्याने विचार करण्यासाठी, बिनधास्तपणे नवोन्मेष साकारण्यासाठी आणि दृढ विश्वासाने नेतृत्व करण्यासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा मूळ उद्देश मात्र कायम राखला गेला आहे.

या वर्षीच्या आयोजनाच्या व्याप्तीतून या महत्त्वाकांक्षेचे गहिरेपणच अधोरेखित होते. विकसित भारत प्रश्नमंजुषा स्पर्धेत ५० लाखांपेक्षा जास्त तरुण स्पर्धकांनी भाग घेतला होता. हा विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ मधील निवडीचा पहिला टप्पा होता. चार दिवसांच्या या सोहळ्यादरम्यान, देशाच्या कानाकोपऱ्यातील सहभागी युवा प्रतिनिधींना व्यावहारिक ज्ञान, विचार आणि दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळाली, त्यादृष्टीने त्यांचा राष्ट्रीय आणि जागतिक कीर्तीच्या दिग्गज व्यक्तींशी संवाद घडला. हा संवाद विविध विषय आणि भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाणारा असेल हे नक्की.

हे व्यासपीठ खऱ्या अर्थाने आपल्या तरुणांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देते इतकेच नाही, तर त्यांचे म्हणणे ऐकले जाईल याचीही काळजी घेते आणि हेच विकसित भारत युवा नेता संवाद २०२६चे वेगळेपण आहे. या व्यासपीठामुळे भारतातील तरुणांच्या प्रतिनिधींना आपले विचार, आकांक्षा आणि त्यांच्या मनातील उपाययोजना थेट भारताच्या पंतप्रधानांसमोर मांडणे शक्य झाले आहे. संपूर्ण देशभरात स्वामी विवेकानंद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केल्या जाणाऱ्या १२ जानेवारीला, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: भारत मंडपममध्ये तरुणांशी संवाद साधतील. त्यातून पंतप्रधानांना या तरुणांच्या मनातील भविष्यातील भारताचे चित्र कसे आहे आणि त्याला कशा प्रकारे आकार देण्याचा निर्धार त्यांनी केला आहे हे समजून घेता येईल.

आता भारत आपल्या स्वातंत्र्याच्या शताब्दीच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी देशाला मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस असलेल्या आणि त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत परावर्तित करण्याचा दृढ निश्चय असलेल्या तरुण वर्गाच्या सक्रिय सहभागाची गरज आहे. त्यादृष्टीने पाहिले तर विकसित भारत युवा नेतृत्व संवाद हे निव्वळ संवादासाठीचे एक व्यासपीठ नाही, तर ही एक मोहीम आहे. ही मोहीम भारतातील तरुण पिढीला पुढाकार घेत नेतृत्व करण्याचे, राष्ट्रीय आव्हानांचा सामना करण्याचे आणि विकसित भारताच्या ध्येयाशी आपल्या आकांक्षाना जोडण्याचे आवाहन करणारी मोहीम आहे.

ज्यांच्यामध्ये नेतृत्व करण्याचा आत्मविश्वास आहे, जे राष्ट्रसेवेसाठी वचनबद्ध आहेत त्यांच्याकडूनच विकसित भारताची जडणघडण होणार आहे. त्यासाठी भारतातील तरुण आता सज्ज झाले आहेत. अशावेळी देशानेही त्यांच्या खांद्याला खांदा लावून चालण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे.

**(लेखक केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा तसेच कामगार आणि रोजगारमंत्री आहेत)**

# ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्व

● **माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष**



**नव्या** वर्षाची सुरुवात एका दु:खदायक बातमीने झाली. ज्येष्ठ हिंदुत्ववादी विचारवंत व लेखक डॉ.अशोकराव मोडक यांचे २ जानेवारी रोजी रात्री निधन झाले. ज्या व्यक्ती अजूनही आपल्याबरोबर असल्या पाहिजेत असे वाटत राहते अशा अत्यंत कमी व्यक्तींपैकी अशोकराव होते. ज्ञानसंपन्न व सक्रीय आयुष्य जगून अशोकरावांनी ह्या जगाचा निरोप घेतला आहे. आपल्या आजारपणातही अशोकरावांचे वाचन, चिंतन व लेखन सुरूच होते. रामजन्मभूमी आंदोलनाच्या राजकीय परिणामांचे विश्लेषण करणारे 'अयोध्या आंदोलनाचा ताळेबंद' हे अभ्यासपूर्ण पुस्तक त्यांनी ह्याच आजारपणाच्या काळात लिहिले.

साधारण १९८० सालापासून माझा अशोकरावांशी संबंध व स्नेह होता. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. १९९२ साली ते कोकण पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून गेले. बारा वर्षे त्यांनी विधान परिषदेत प्रभावी कामगिरी करून दाखवली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दौऱ्यावर आल्यानंतर त्यांचा मुक्काम बहुधा माझ्या घरीच असायचा. तत्पूर्वी, त्यांनी १९६३ ते १९९४ पर्यंत मुंबईत प्राध्यापक म्हणून काम केले. २०१५ मध्ये, भारत सरकारने त्यांना पाच वर्षे राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक पदाने सन्मानित केले. त्यांनी छत्तीसगडमधील बिलासपूर येथील गुरु घासीदास केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. त्यांनी १०४ प्रबंध आणि ४० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध विद्यापीठांमध्ये व्याख्याने दिली आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांना चतुरंग प्रतिष्ठानकडून जीवनगौरव पुरस्कार मिळाला होता. डॉ.अशोकराव मोडक हे संघ परिवारातील एक फार वेगळे व्यक्तिमत्व होते. हिंदुत्व आणि संघ विचारांच्या बरोबरीने त्यांनी साम्यवाद आणि साम्यवादी जग, विशेषत: सोविएट रशियाचा सखोल अभ्यास केला होता. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्रात एम.ए. तर जेएनयूमधून पीएच.डी. केले होते. भारताला सोव्हिएत रशियाची आर्थिक मदत हा अशोकरावांचा पीएच.डी.चा विषय होता. त्या अभ्यासासाठी अशोकराव रशियामध्ये राहून आले होते. त्यांच्या सखोल अभ्यासामुळे, त्यांना सोव्हिएत रशियाच्या आर्थिक आणि राजकीय संदर्भातील तज्ज्ञ मानले जात असे. भारतातील साम्यवाद, साम्यवादी पक्ष व त्यांच्या विविध कारवाया ह्या विषयांवर सातत्याने अभ्यासपूर्ण लेखन करण्याचे काम अशोकरावांनी अनेक वर्षे केले. त्यांच्या व माझ्या स्नेहाचा तो एक समान धागा होता. 'डाव्यांचा खरा चेहरा' ह्या माझ्या पुस्तकाला त्यांनी ३६ पानांची विस्तृत व अत्यंत मार्मिक प्रस्तावना लिहिली होती.

अशोकराव स्वभावाने, बोलण्यात व वागण्यात अत्यंत साधे व सौम्य होते. वैचारिक मांडणी आक्रमक रीतीने करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता, पण त्यांची मांडणी ठाम होती. व्यापक व सखोल अभ्यासाचा आधार असल्यामुळे त्यांचे मुद्दे खोडून काढणे किंवा त्यांनी घेतलेल्या आक्षेपांना उत्तर देणे विरोधकांना जड जात असे. त्यांची भाषणाची शैली साधी पण प्रवाही होती. आपल्या विचारांची सकारात्मक, बुद्धिवादी मांडणी करत असतानाच आपल्याला विरोध करणाऱ्या विचारधारांची साधार, बुद्धिगम्य छाननी करणारा, बुद्धीवादाशी निष्ठा बाळगणारा अशोकरावांसारखा अभ्यासक, विचारवंत दुर्मिळ आहे. त्यामुळेच डॉ.अशोकराव मोडक ह्यांची उणीव दीर्घकाळ जाणवत राहील. पण त्यांनी लिहिलेली पुस्तके येणारी अनेक वर्षे हिंदुत्व विचारांच्या कार्याला मदत करत राहतील. काही महिन्यांपूर्वी मी त्यांना घरी जाऊन भेटलो होतो. फोनवर आमच्या गप्पा अलिकडेपर्यंत चालू होत्या. प्रत्यक्ष भेटायला जाणे मात्र काही ना काही कारणाने होत नव्हते. अखेर भेट राहूनच गेली ही खंत आता मनात कायम राहील.

**डॉ.अशोकराव मोडक ह्यांना विनम्र श्रद्धांजली.**

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com